साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

चाहूल लागता थंडीची... आठवते दुकान जरीवालाची
। स्वेटर्स । जॅकेट। 2 in 1 जर्किन
। टोपी । ग्लोज । सॉक्स । मफलर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी.
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505
जरीवाला मेन्स, महाजनवाडी, अहिल्यानगर.मो. 9850216268

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २६.११.२०२६ | अंक नं. १९९ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी

लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02

92.50 शुध्द चांदीपासुन बनविलेले
खास आपल्या लाडक्या
लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैजण, वाळे, तोडे, मग आणि बरचं काही..

सारसनगर येथील नवीन वीज उपकेंद्र महिनाभरात पूर्ण क्षमतेने सुरू होणार

३.२ कोटींचा खर्च; ३० हजार वीज ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठ्याचा लाभ

नगर – शहरातील वाढती वीज मागणी आणि वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येवर उपाय म्हणून महावितरणच्या वतीने सारसनगर येथे उभारण्यात आलेले ३३/११ के.व्ही. क्षमतेचे नवीन वीज उपकेंद्र येत्या महिनाभरात पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. १० एमव्हीए क्षमतेच्या या उपकेंद्रामुळे मार्केट यार्ड, सारसनगर, बुरूडगाव रोड, पुणे एसटी स्टँड आणि नगर कॉलेज परिसरातील सुमारे ३० हजार वीज ग्राहकांना अखंडित, योग्य व्होल्टेजसह दर्जेदार वीजपुरवठा मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

महावितरणच्या अहिल्यानगर शहरातील सारसनगर येथे हे नवीन उपकेंद्र उभारण्यात आले आहे. उपकेंद्राच्या उभारणीचे काम पूर्ण झाले असून, संबंधित भागांना वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या वीजवाहिन्यांची कामे अंतिम टप्प्यात आहेत. ही कामे पूर्ण झाल्यानंतर उपकेंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात येणार आहे.

महावितरणच्या एमएसकेव्हीवाय २.० आणि आरडीएसएस योजनेअंतर्गत या उपकेंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे ३ कोटी २० लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. शहरातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करणे, वाढत्या वीज भाराचे योग्य नियोजन करणे आणि ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध करून देणे, हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे.



विद्युत भवन उपकेंद्रावरील भार होणार कमी

सद्यस्थितीत मार्केट यार्ड, सारसनगर, बुरूडगाव रोड, पुणे एसटी स्टँड तसेच नगर कॉलेज परिसरातील अनेक भागांना विद्युत भवन येथील उपकेंद्रातून वीजपुरवठा केला जात आहे. अहिल्यानगर शहराचा विस्तार झपाट्याने होत असून, या परिसरात नवीन निवासी वसाहती, व्यावसायिक आस्थापना आणि नागरी वस्तीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्याचबरोबर वीज ग्राहकांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे.

वाढत्या वीज मागणीमुळे विद्युत भवन येथील उपकेंद्रावर अतिरिक्त भार पडत असून, काही भागांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत आहेत. विशेषतः उन्हाळ्यात आणि वीज मागणी वाढलेल्या कालावधीत या समस्येचा अधिक सामना करावा लागत आहे.

वीजपुरवठा व्यवस्थेला मिळणार बळ

सारसनगर येथील नवीन उपकेंद्र कार्यान्वित झाल्यानंतर विद्युत भवन येथील उपकेंद्रावरील वीज भार कमी होणार आहे. त्यामुळे दोन्ही उपकेंद्रांमधून वीजपुरवठ्याचे अधिक प्रभावीपणे विभाजन आणि नियोजन करता येणार आहे.

या नवीन उपकेंद्रामुळे संबंधित परिसरातील वीज वितरण व्यवस्थेची क्षमता वाढणार असून, वीजपुरवठ्यातील तांत्रिक अडचणी कमी करण्यास मदत होईल. तसेच योग्य व्होल्टेज राखणे, वारंवार होणारे वीजखंडित टाळणे आणि ग्राहकांना अधिक विश्वासार्ह वीजपुरवठा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

सारसनगर उपकेंद्र पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर शहराच्या या भागातील वीज वितरण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर महावितरणच्या या प्रकल्पामुळे अहिल्यानगर शहरातील वीजपुरवठा अधिक सक्षम आणि स्थिर होण्यास मदत मिळणार आहे.

व्हॉटस्ॲपवर एपीके फाईल पाठवून मोबाईलचा ॲक्सेस घेत सेवानिवृत्ताची ९ लाख ९५ हजार रुपयांची फसवणूक

नगर – अहिल्यानगर येथील नगर-कल्याण रोडवरील विद्या कॉलनी, आदर्शनगर परिसरात राहणाऱ्या एका सेवानिवृत्त व्यक्तीची ९ लाख ९५ हजार रुपयांची सायबर फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

फिर्यादी एकनाथ विठ्ठल फापाळे (वय ५९, रा. प्लॉट नंबर १४०, विद्या कॉलनी, आदर्शनगर, नगर-कल्याण रोड, अहिल्यानगर) हे घरी असताना हा प्रकार घडला. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ०५.४७ वाजल्यापासून ते २२ नोव्हेंबर रोजी रात्री २.२६ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात सायबर चोरट्याने ही फसवणूक केली.

फिर्यादीच्या व्हॉटस्ॲप क्रमांक वर महाराष्ट्र बँक लाईफ सर्टिफिकेटची एपीके फाईल पाठवून अनोळखी व्यक्तीने त्यांचा मोबाईल ताब्यात घेतला. फिर्यादीच्या परवानगीशिवाय आणि बेकायदेशीरपणे त्यांच्या मोबाईलचा ॲक्सेस मिळवून सायबर चोरट्याने तांत्रिक हातखंडा वापरला. मोबाईलचा ताबा घेतल्यानंतर आरोपीने फिर्यादीच्या बँक ऑफ महाराष्ट्र येथील बचत खाते क्रमांक मधून वेळोवेळी रक्कम कपात करून घेतली. या प्रकाराद्वारे फिर्यादीची तब्बल ९,९५,००० रुपये (नऊ लाख पंच्याण्णव हजार रुपये) इतक्या रकमेची आर्थिक फसवणूक करण्यात आली.

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार २५ नोव्हेंबर रोजी दुपारी सायबर पोलीस स्टेशन येथे या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (४), ३१९ (२) सह माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ (डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगर रोलिंग शटर
जुने शटर रिपेरिंग
गेअर शटर रिपेरिंग
नवीन शटर मिळेल
संपर्क : रमेश ढवळे
7350682390
रिपेरिंग सर्व्हिस संपूर्ण अ.नगर जिल्हा मिळेल.

दुष्काळग्रस्त भागात चारा बँक सुरू करण्यासाठी शासनाची मंजुरी : पशुधन वाचवण्यासाठी निर्णय

नगर – जिल्ह्यात वाढत्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा व पाणी उपलब्धतेचा प्रश्न गंभीर होत असल्याने दुष्काळग्रस्त भागांमध्ये चारा बँक सुरू करून चारा नियोजन करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. यामुळे पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप मंडल स्तरावर दुष्काळग्रस्त भागांचा आढावा घेण्यात येत आहे. सध्या जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळाची तीव्रता वाढत असून पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होत आहे. अशा परिस्थितीत पशुधन टिकवणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान बनले आहे. पशुधनासाठी पुरेसा चारा आणि पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी पालकमंत्र्यांनी मंडल अध्यक्षांना संबंधित भागांमध्ये लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या अनुषंगाने केडगाव भाजप मंडल अध्यक्ष भरत ठुबे यांनी जिल्ह्यातील पशुधनासाठी चारा व पाणीटंचाईच्या प्रश्नाकडे लक्ष वेधत, पालकमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय व पणन मंत्री जयकुमार रावल यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. दुष्काळग्रस्त भागांमध्ये चारा बँक सुरू करण्यात याव्यात, जेणेकरून चाऱ्याचे योग्य नियोजन करून पशुधनाला आवश्यक चारा उपलब्ध होईल, अशी मागणी त्यांनी या निवेदनातून केली होती.


मंत्री जयकुमार रावल यांची भेट घेत जनावरांसाठी चारा बँक सुरु करण्याचे निवेदन देताना केडगाव भाजप मंडल अध्यक्ष भरत ठुबे. (छायाचित्र : अमीत मन्यार)

भरत ठुबे यांच्या मागणीची दखल घेत मंत्री जयकुमार रावल यांनी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. शेतकरी उत्पादक संस्था, शेतकरी गट तसेच स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून दुष्काळग्रस्त भागांमध्ये चारा बँक सुरू करणे आणि चाऱ्याचे योग्य नियोजन करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत.चारा बँक सुरू करण्याबाबत शासनाकडून अधिकृत सूचना प्राप्त झाल्याने पशुधन पालकांसाठी दिलासादायक निर्णय ठरला आहे. या निर्णयामुळे दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता आणि नियोजन करण्यास मदत होणार आहे. शासनाच्या या निर्णयाबद्दल केडगाव भाजप मंडलाच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच पणन मंत्री जयकुमार रावल यांचे आभार व्यक्त करण्यात आल्याची माहिती भरत ठुबे यांनी दिली आहे.

Turn Data into Insights and Build a Smarter Future!
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
100% JOB Assistance
CERTIFICATE COURSE IN
DATA ANALYST
MASTER INDUSTRY-RELEVANT TOOLS
EXCEL Data Analysis & Automation
POWER BI Interactive Dashboards
SQL Data Querying & Management
PYTHON Data Analysis & Scripting
TABLEAU Data Visualization

ENROLL NOW!
दिल्ली गेट शाखा
आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769
जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी. अ.नगर.
9371151769
पाईपलाईन शाखा
रुचा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769


थंडीचे कपडे...
जन्मलेल्या बाळापासून मोठ्या महिला व पुरुषांसाठी, मुला-मुलींसाठी...
स्वेटर्स,जॅकेट, जर्कीन, टोपी, उलन स्टोल,मफलर, सॉक्स,स्वग व
अजून बरेच काही आणि तेही रास्त दरात
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक के. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन - २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९६६६६६६
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

वाळू वाहतूकीवर कारवाई न करण्यासाठी पोलीस हवालदाराला ४० हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले

नगर - वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा वाहनावर कारवाई न करण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत सुरू ठेवण्यासाठी ४० हजार रुपयांचा हप्ता स्वीकारणाऱ्या पोलीस हवालदाराला नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली आहे. अशोक रामा शिंदे (वय ४६, बक्कल नंबर ७९२) असे या लाचखोर हवालदाराचे नाव असून, ते मूळचे शिर्डी शहर वाहतूक शाखेत नेमणुकीस असून सध्या शिर्डी येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात संलग्न आहेत.

या प्रकरणातील ३२ वर्षीय तक्रारदार यांचा शेती व ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. आठ दिवसांपूर्वी त्यांना वाळू डिलिव्हरीची एक ऑर्डर मिळाली होती. त्यानुसार २१ नोव्हेंबर रोजी ते हायवा वाहनातून वाळूची वाहतूक करत असताना, हवालदार अशोक शिंदे यांनी त्यांचे वाहन अडवले. या वाहनावर कायदेशीर कारवाई न करण्यासाठी आणि पुढील वाळू वाहतूक सुरळीत सुरू ठेवण्याच्या मोबदल्यात शिंदे यांनी तक्रारदाराकडे दरमहा ५० हजार रुपये हप्त्याची मागणी केली होती. याविरोधात तक्रारदाराने २५ नोव्हेंबर रोजी नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची खातरजमा करण्यासाठी एसीबीच्या पथकाने त्याच दिवशी पडताळणी कारवाई केली. या पडताळणीदरम्यान हवालदार शिंदे यांनी तडजोडीअंती दरमहा ४० हजार रुपयांचा हप्ता स्वीकारण्याचे पंच साक्षीदारांसमक्ष मान्य केले. त्यानंतर सापळा रचून २५ नोव्हेंबर रोजीच सिन्नर-शिर्डी रोड लगतच्या देर्डे फाटा (ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर) येथे हवालदार अशोक शिंदे यांना तक्रारदाराकडून ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने रंगेहात पकडले. या प्रकरणी आरोपी लोकसेवक अशोक शिंदे यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याविरोधात कोपरगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक प्रदिप मैराळे आणि अपर पोलीस अधीक्षक कविता फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सापळा अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक योगेश शिंदे यांनी काम पाहिले, तर पथकात पोलीस हवालदार विनोद चौधरी, नितीन नेटारे, पोलीस शिपाई प्रमोद पाळदे आणि चालक सहायक पोलीस उपनिरीक्षक घुगे यांचा समावेश होता.

नगरमध्ये क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक करणाऱ्या ओव्हरलोड वाहनांकडे दुर्लक्ष; मात्र सर्वसामान्य वाहनचालकांकडून किरकोळ नियमभंग झाल्यास तातडीने कारवाई

कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशी करून सात दिवसांत लेखी अहवाल द्या; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा

नगर - अहिल्यानगर शहरातील प्रमुख रस्ते, अंतर्गत मार्ग तसेच शहरालगतच्या महामार्गांवर क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक करणाऱ्या ओव्हरलोड अवजड वाहनांचा सुळसुळाट वाढला आहे. या वाहनांमुळे रस्त्यांचे नुकसान, वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका निर्माण होत असतानाच, या प्रकारामागे कथित आर्थिक गैरव्यवहार आणि एजंटांची साखळी कार्यरत असल्याचा आरोप शिवप्रहार संघटनेने केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून सात दिवसांच्या आत ठोस कारवाई व लेखी अहवाल द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

यासंदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी जिल्हाध्यक्ष विशाल सुनील म्हस्के, गोरक्षनाथ आढाव, सिद्धेश्वर साळुंखे, प्रशांत सराईकर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दक्षिण आणि उत्तर भारताला जोडणारे महत्त्वाचे वाहतूक केंद्र म्हणून अहिल्यानगरची ओळख आहे. शहरातून पुणे, छत्रपती संभाजीनगर, बीड, सोलापूर, पाथर्डी, जामखेड, श्रीगोंदा, शिर्डी, राहुरी, मनमाड आणि कल्याण आदी दिशांनी मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. मात्र, यातील अनेक वाहने निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक करीत असल्याने रस्त्यांची दुरवस्था होत आहे. त्याचबरोबर वाहतूक कोंडी आणि गंभीर अपघातांचा धोका वाढत असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.



काही अवजड वाहनांच्या नंबर प्लेटवरील क्रमांक मुद्दाम खोडलेले, अस्पष्ट अथवा झाकलेले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा वाहनांची ओळख पटविणे कठीण होत आहे. तसेच काही ठराविक व्यक्तींकडून दरमहा लाखो रुपयांची कथित वसुली होत असल्याची चर्चा असून, यामध्ये अधिकारी आणि एजंटांचे अभय असल्याचा संशय संघटनेने व्यक्त केला आहे. सर्वसामान्य वाहनचालकांकडून किरकोळ नियमभंग झाल्यास तातडीने कारवाई केली जाते; मात्र ओव्हरलोड वाहनांबाबत दुर्लक्ष का केले जाते, असा सवालही संघटनेने उपस्थित केला आहे.

संघटनेने शहरातील प्रमुख रस्ते, अंतर्गत मार्ग आणि महामार्गांवर विशेष तपासणी मोहीम राबवून ओव्हरलोड वाहनांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली आहे. अस्पष्ट, खोडलेल्या, झाकलेल्या अथवा नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर कारवाई करून ती ताब्यात घ्यावीत, वजनकाट्यांची नियमित तपासणी करावी, तसेच कथित एजंट आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणात कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर विभागीय व कायदेशीर कारवाई करावी. विशेष तपासणी पथक स्थापन करून नागरिकांसाठी तक्रार निवारण व्यवस्था आणि स्वतंत्र संपर्क क्रमांक उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. ओव्हरलोड वाहनांचे क्रमांक, छायाचित्रे आणि कथित आर्थिक व्यवहारांशी संबंधित पुरावे संबंधित प्राधिकरणासमोर सादर करण्याची तयारीही संघटनेने दर्शविली आहे.

निवेदन प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत कार्यवाही करून सविस्तर लेखी अहवाल द्यावा; अन्यथा होणाऱ्या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशारा जिल्हाध्यक्ष विशाल म्हस्के व पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती परिवहन आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

'रामायण' चित्रपटातून रावणाचे उदात्तीकरण; आक्षेपार्ह दृश्ये वगळावीत

दुसऱ्या भागाच्या प्रदर्शनापूर्वी संत व रामायण अभ्यासकांकडून चित्रपटाची पडताळणी करावी

नगर - रामायण चित्रपटातील काही दृश्ये मूळ वाल्मिकी रामायणाशी विसंगत असून, त्यातून प्रभू श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण यांच्या व्यक्तिरेखांचे अवमूल्यन होत असल्याचा, तसेच रावणाचे उदात्तीकरण होत असल्याचा आक्षेप हिंदु जनजागृती समितीच्या वतीने घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर चित्रपटातील आक्षेपार्ह दृश्ये वगळावीत, तसेच आगामी दुसऱ्या भागाच्या प्रदर्शनापूर्वी संत आणि रामायणाच्या अभ्यासकांकडून चित्रपटाची पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली



यासंदर्भात अहिल्यानगर येथील निवासी जिल्हाधिकारी श्री. गीते यांना हिंदु जनजागृती समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले.

निवेदनात रामायणातील मूळ कथानक, पात्रांचे स्वरूप आणि धार्मिक भावनांचा विचार करून चित्रपटाची निर्मिती व सादरीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच चित्रपटातील आक्षेपार्ह दृश्यांची दखल घेऊन ती वगळावीत आणि आगामी भाग प्रदर्शित करण्यापूर्वी संबंधित तज्ज्ञांकडून त्याची तपासणी करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी हिंदु जनजागृती समितीचे हिंदू संघटक बापू ठाणगे, सुरेखा सांगळे, अजिंक्य गायकवाड, अजित कटारिया, संजय जोशी, सुरेखा विद्ये आदी उपस्थित होते.

हजरत पिर सरकार शहा शरीफ यांचा २७ व २८ नोव्हेंबर रोजी संदल व उर्स

नगर - हजरत पिर सरकार शहा शरीफ (रहे) दर्गा दायरा यांचा २७ नोव्हेंबर रोजी पहाटे संदल व २८ नोव्हेंबर रोजी उर्स साजरा करण्यांत येणार असल्याची माहिती ट्रस्टचे चेअरमन शेख मोहम्मद साबीर लाड मोहम्मद यांनी दिली आहे. दर्गादायरा येथील हजरत पिर सरकार शहा शरीफ (रहे) दर्गाचा संदल व उर्स ट्रस्टचे वतीने साजरा करण्यांत येणार आहे.

२७ नोव्हेंबर रोजी पहाटे ४.३० वाजता पांरपारीक धार्मीक पध्दतीने दर्ग्यावर संदल लावुन व फुलांचे चादरी अर्पण करुन धार्मीक फातेहा पठण करुन नारीजा व शेरनी (प्रसादा) चे वाटप करण्यात येणार आहे, तसेच २८ नोव्हेंबर रोजी उर्स साजरा करण्यात येणार आहे.

दर्गा परिसरात खाद्य पदार्थ, खेळणी विक्रेते व दुकाने लावण्यास ट्रस्टचे वतीने कोणासही परवानगी मिळणार नाही. विक्रेत्यांनी दर्गा आवाराबाहेर आपली दुकाने लावावी, तसेच भाविकांनी ट्रस्टला सहकार्य करावे, असे आवाहन ट्रस्टचे चेअरमन शेख मोहम्मद साबीर लाड मोहम्मद, विश्वस्त ॲड. शेख हाफिज एन. जहागीरदार नोटरी पब्लीक, शेख निजाम शरीफमियाँ, वशंज विश्वस्त डॉ. सय्यद समीर शहा महेमूद, शेख नौशाद बाबामियाँ, सय्यद अत्तामियॉ पाशामियॉ व सय्यद साबीर दरवेशमियॉ, तसेच समस्त वशंज दर्गादायरा गांवकरी यांनी केले आहे.

नितीन नवाथे यांचे हृदयविकाराने निधन



पुणे - पुणे येथील रहिवासी नितीन भास्कर नवाथे (वय ६८) यांचे २५ नोव्हेंबर रोजी हृदयविकारने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथील वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ बहीण, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सोसायटी हायस्कूलचे दिवंगत शिक्षक भास्कर नवाथे यांचे ते चिरंजीव होत.

वनीताबाई कटारिया यांचे अल्प आजाराने निधन



नगर - हिरागुलाब बंगला, आनंदधाम येथील रहिवासी सौ. वनीताबाई कटारिया (वय ७८) यांचे २८ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, मुलगा मंगेश, दोन मुली मनिषा, मंजुषा, दीर सुरेशलाल, रमेशलाल, पुतणे नितीन, अजय, डॉ.आनंद, विनय, विकास, वैभव कटारिया, नातू गौतम, हिमांशू, यश, तेज, मनन असा परिवार आहे. वसंतलाल हिरालाल कटारिया (दलाल के.वसंतलाल) यांच्या त्या पत्नी होत.

सौ. हेमलताबाई गाडेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सहकारनगर येथील रहिवासी सौ.हेमलता गाडेकर (वय ६७) यांचे अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर अहिल्यानगर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, भाऊ, भावजयी, सून, नातवंडे असा परिवार आहे. अँड. सुभाष चंद्रभान गाडेकर यांच्या त्या पत्नी होत.

माधव तुपे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - कोरडगाव, ता.पाथर्डी येथील रहिवासी माधव बलभीमराव तुपे (वय ४४) यांचे २५ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २६ नोव्हेंबर रोजी पाथर्डी अमरधाम (कोरडगाव रोड) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे वडील, भाऊ, आई, पत्नी, २ मुले असा परिवार आहे.

सुभाष कुलकर्णी यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील बेलापूर शुगर कंपनीचे माजी केमिस्ट सुभाष शंकर कुलकर्णी (वय ८३) यांचे २५ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. ब्राह्मण सेवा संघाचे सचिव व रा.स्व.संघाचे स्वयंसेवक अभिजीत कुलकर्णी यांचे वडील होत.



आंबेडकरी समाजाच्या वतीने संविधान गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त मार्केटयार्डसमोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन; मार्केटयार्डसमोर संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक पठण

संविधान दिन सामाजिक बांधिलकी आणि अधिकार-जाणिवेचे प्रतीक : आमदार संग्राम जगताप

नगर - समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने संविधान गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त मार्केटयार्ड समोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक पठण करण्यात आले. यावेळी संविधानाच्या सामूहिक पठनाने परिसर दुमदुमून गेला. आमदार संग्राम जगताप यांना संविधानाच्या उद्देशिकेची प्रत देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या भारतीय संविधानामुळे जगाला प्रगल्भ लोकशाहीची प्रचिती आली. राजेशाहीचा अंत करून देशाची सूत्रे सर्वसामान्य मतदारांच्या हातात देण्याचे ऐतिहासिक कार्य संविधानाने केले. संविधान हे कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण भारतीयांचे आहे. संविधानामुळे देशात समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा भक्कम पाया निर्माण झाला आहे. या संविधानिक मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना आणि निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली.

याप्रसंगी सुरेश बनसोडे म्हणाले की, संविधान दिन हा सामाजिक बांधिलकी आणि आपल्या अधिकारांच्या जाणीवेचे प्रतीक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान हे आपल्या आयुष्याचे दिशादर्शक आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचविण्यासाठी संविधानाने मजबूत चौकट निर्माण केली आहे. त्यामुळे प्रत्येकाने संविधानातील मूल्यांचे जतन, पालन आणि प्रसार करण्याचे कार्य सातत्याने केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आमदार संग्राम जगताप, सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, इंजि. परिमल निकम, प्रा. माणिक विधाटे, प्रा. जयंत गायकवाड, अमित काळे, सिद्धार्थ आढाव, विलास साठे, विजयराव भांबळ, महेश भोसले, प्रा.डी.आर. जाधव, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, गौतमी भिंगारदिवे, सृजन भिंगारदिवे, प्रा. एल.बी. जाधव, प्रा. कदम सर, प्रा. गायकवाड सर, मृणाल भिंगारदिवे, अजय पाखरे, लक्ष्मण माघाडे, निखिल साळवे, गौतम म्हस्के, यशवंत भाबळ, गौतम पाचारण, दीपक पाटोळे, श्रेयस भिंगारदिवे, सतीश शिरसाठ, अंकुश मोहिते, रवी कांबळे, संजय भिंगारदिवे, प्रा. गजभिये सर, अविनाश कांबळे, आकाश कदम, नितीन खंडारे, बौद्धचार्या ठोंबे उपस्थित होते.

मळीच्या साठवण टाक्या कोसळल्याने 'टेकस्टार' कारखान्याचे मोठे नुकसान

आर. एस. जरांगे यांची माहिती; नेवासे तालुक्यातील घोडेगाव एमआयडीसीमध्ये घडला प्रकार



नगर - नेवासे तालुक्यातील घोडेगाव येथील एमआयडीसी मध्ये आमच्या शेजारी असलेल्या एका कंपनीच्या कारखान्याच्या मळीच्या साठवण टाक्या कोसळल्या -मुळे आमच्या कारखान्याच्या मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. याशिवाय, मोठ्या प्रमाणात मळी आमच्या कारखान्याच्या आतील व बाहेरील परिसरात पसरल्यामुळे कारखाना परिसर असुरक्षित झाला असून आमच्या उत्पादन प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला आहे. या दुर्घटनेमुळे आमचे आर्थिक नुकसान झाले असून, सुरक्षितता, पर्यावरण आणि औद्योगिक कामकाजाच्या दृष्टीने समस्या निर्माण झाल्या आहेत. आमच्या कारखान्यातील उत्पादन कार्यावर परिणाम झाला असून, परिस्थिती आणखी बिघडू नये यासाठी लवकर कार्यवाही करावी अशी मागणी टेकस्टार इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक आर. एस. जरांगे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

याबाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की, ९ नोव्हेंबर रोजी आमच्या कारखान्यालगत असलेल्या शेजारील कारखान्यामध्ये एक औद्योगिक अपघात घडला आहे. सदर शेजारील कारखान्यातील मळीच्या साठवणुकीच्या टाक्या अचानक कोसळल्यामुळे मोठ्या प्रमाणात मळी आमच्या कारखाना परिसरात पसरली. या संदर्भात आम्ही एमआयडीसी प्रादेशिक कार्यालय, अहिल्यानगर, एमपीसीबी कार्यालय व कारखाना निरीक्षक कार्यालय यांना कळविले, परंतु अद्यापपर्यंत संबंधीतांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

अपघातग्रस्त घटनास्थळाची तातडीने पाहणी करून झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष तपासणी व मूल्यांकन करण्यात यावे, संबंधित कारखान्यास आमच्या कारखाना परिसरात पसरलेली मळी व ढिगारा तातडीने हटविण्याचे तसेच बाधित परिसराची लवकरात लवकर स्वच्छता व पूर्ववत दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात यावेत, सदर अपघात घडण्यामागील कारणांची चौकशी करून या दुर्घटनेस जबाबदार असलेल्या व्यक्ती अथवा संस्थेची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, सदर अपघातास जबाबदार असलेल्या संबंधितांवर नियमांनुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी. तातडीची बाब म्हणून अपघातग्रस्त भाग हा बंद ठेवण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

शिक्षणतज्ञ, कुशल प्रशासक आणि आदर्श मार्गदर्शिका स्व. किशोरी सायमन यांना भावपूर्ण श्रद्धांजली...!

एक आदर्श शिक्षिका, खंबीर प्रशासक आणि हजारो विद्यार्थ्यांना सन्मार्गावर आणणाऱ्या प्रेमळ मार्गदर्शिका स्व. किशोरी सायमन यांची आज (२७ नोव्हेंबर) ७४ वी जयंती. दुबईहून सहा महिन्यांच्या वास्तव्यानंतर मुंबईत परतल्यावर थोरली कन्या त्यांना घेण्यासाठी येत असतानाच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या जाण्याने कुटुंबीयांसह अफाट विद्यार्थीवर्ग पोरका झाला आहे.

२७ नोव्हेंबर १९५२ रोजी जन्मलेल्या किशोरी सायमन यांनी अर्थशास्त्र (Economics) विषयात पदव्युत्तर पदवी आणि हिंदी भाषेत 'पंडित' ही पदवी संपादन केली होती. 'मेहेर इंग्लिश स्कूल'मधून त्यांनी अध्यापनाची सुरुवात केली. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच त्यांनी नैतिक मूल्ये आणि दृढनिश्चयाचे धडे दिले. पुढे आपल्या कुशल व्यवस्थापनाने त्यांनी संस्थेला प्रगतीची नवी उंची गाठून दिली. त्यांनी मांडलेल्या प्रस्तावानुसारच शाळा व्यवस्थापन समितीने



'ए.ई.एस. इंग्लिश मीडियम स्कूल'चे (AES English Medium) नामकरण केले. पुढे 'अशोकभाऊ इंग्लिश मीडियम स्कूल'च्या मुख्याध्यापिका म्हणून त्या यशस्वीपणे निवृत्त झाल्या.

सी.एस.आर.डी.-आय. एस.डब्ल्यू आर. (CSRD-ISWR) मधील प्राध्यापक प्रा. एन. सायमन यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या होत्या. शैक्षणिक कार्यासोबतच त्या 'ह्यूम मेमोरियल चर्च'च्या सक्रिय सदस्या होत्या आणि अनेक वर्षे चर्चच्या 'विमेन्स कौन्सिल मेंबर' म्हणून त्यांनी सेवा बजावली. त्यांच्या पश्चात मुलगी, मुलगा आणि नातवंडे असा परिवार आहे.

आज ७४ व्या जयंतीनिमित्त त्यांनी घडवलेले सुजाण नागरिक आणि लावलेले ज्ञानाचे रोपटे हीच त्यांना खरी श्रद्धांजली आहे. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! भावपूर्ण श्रद्धांजली...!

सनी वाधवा, विक्रम बोथे, प्रिया, दीप्ती, सौरभ गांधी, ऋषिकेश करमरकर व समस्त आजी-माजी विद्यार्थी आणि सायमन परिवार.

गृहिणी

आरोग्य

ताप आल्यास काय कराल?

ताप आल्यावर सर्वांत आधी पूर्ण विश्रांती घ्यावी आणि शरीराला ताण येईल असे काम टाळावे. दिवसभरात मुबलक पाणी, ओआरएस, नारळ पाणी, गरम सूप यांसारखे पातळ पदार्थ घ्यावेत, जेणेकरून शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणार नाही. ताप मोजण्यासाठी थर्मामीटर वापरावा आणि ताप किती आहे याची नोंद ठेवावी. डॉक्टरांच्या सल्ल्यानेच तापासाठी औषध घ्यावे आणि औषध घेऊनही ताप कमी होत नसेल, थंडी वाजून ताप येत असेल, उलट्या, पोटदुखी, श्वास घ्यायला त्रास, अंगावर पुरळ येणे यांसारखी लक्षणे दिसत असतील तर लगेच डॉक्टरांकडे जावे. हलके आणि पचायला सोपे अन्न खावे, खोलीत हवा खेळती ठेवावी आणि अंगावर हलकी चादर घ्यावी. ताप आला की स्वतःच्या मनाने अँटिबायोटिक किंवा दुसरी जड औषधे सुरू करू नयेत. एकदम थंड पाण्याने अंघोळ करू नये किंवा बर्फाने शरीर पुसू नये, कारण त्यामुळे शरीराला धक्का बसू शकतो. ताप असूनही कामावर जाणे किंवा जास्त शारीरिक कष्ट करणे टाळावे. ताप लपवण्यासाठी वारंवार औषध घेणे किंवा एकाच वेळी दोन-तीन प्रकारची औषधे घेणे टाळावे. तसेच ताप दोन-तीन दिवसांपेक्षा जास्त टिकून राहिला तर त्याकडे दुर्लक्ष करू नये आणि केवळ घरगुती उपायांवर अवलंबून राहू नये, अशा वेळी डॉक्टरांची भेट घेणे महत्त्वाचे असते.

पाककला

भरली वांगी मसाला

साहित्य : ८-१० लहान वांगी, २ कांदे, बारीक चिरलेले २ टोमॅटो, बारीक चिरलेले १ वाटी ओले खोबरे किसलेले, १/२ वाटी शेंगदाण्याचा कूट २ चमचे तिखट, १ चमचा हळद, १ चमचा गरम मसाला, १ चमचा धने-जिरे पावडर, ४-५ लसूण पाकळ्या, १ इंच आले कोथिंबीर, मीठ, तेल, मोहरी, जिरे, हिंग

कृती : वांगी धुवून, वरून अधिक आकारात चा चिर द्या, आतला भाग मोकळा ठेवा. मिक्सरमध्ये खोबरे, शेंगदाण्याचा कूट, लसूण, आले, थोडी कोथिंबीर, तिखट, हळद, मीठ, गरम मसाला बारीक वाटून घ्या. हा मसाला वांग्यात भरा. कढईत तेल गरम करून मोहरी, जिरे, हिंग टाका. त्यात कांदा टाकून सोनेरी होईपर्यंत परतवा. मग टोमॅटो टाकून मऊ होईपर्यंत शिजवा. आता भरलेली वांगी हळुवार ठेवा, वरून उरलेला मसाला आणि १ ग्लास पाणी टाका. झाकण ठेवून १५-२० मिनिटे मंद आचेवर शिजवा. वांगी मऊ झाली की वरून कोथिंबीर टाका. गरम गरम भाकरी किंवा भातासोबत वाढा.

वास्तू

मुख्य दरवाजा

* मुख्य दरवाजाची उंची घरातील इतर दरवाजांपेक्षा थोडी जास्त असावी.
* मुख्य दरवाजाला उंबरठा असावा, उंबरठ्याशिवाय दरवाजा ठेवू नये.
* मुख्य दरवाजाचा रंग गडद निळा किंवा काळा ठेवू नये.
* स्वयंपाकघरात गॅस शेगडी खिडकीजवळ ठेवू नये.
* स्वयंपाकघरात पिण्याच्या पाण्याचे भांडे ईशान्येला ठेवावे.
* बेडरूममध्ये बेडखाली चपला ठेवू नयेत. * बेडरूमच्या खिडकीवर जड पडदे लावू नयेत.
* बाथरूममध्ये आरसा पूर्व किंवा उत्तर भिंतीवर लावावा.
* मुलांच्या खोलीत बेड पूर्वेकडे डोके करून ठेवावा

सौंदर्य

* दह्यात साखर मिसळून ओठांवर हलके घासल्यास मृत त्वचा निघते.
* रात्री केस मोकळे सोडून झोपू नये, वेणी घालून झोपावे.
* हिरव्या पालेभाज्या खाल्ल्याने त्वचेवर तेज येते.
* केसांना रोज तेल लावू नये, दोन दिवसाआड लावावे.

सल्ला

* बटाट्याला कोंब येऊ नये म्हणून सोबत एक सफरचंद ठेवा.
* टोमॅटो कधीच फ्रीजमध्ये ठेवू नका, चव जाते.
* हिरवी मिरची देठ काढून ठेवल्यास जास्त दिवस टिकते.
* पालक धुतल्यावर लगेच वापरावा, ठेवल्यास काळा पडतो.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर २०२६

संकष्ट चतुर्थी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, आर्द्रा १५।०९, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३३ मि.

राशिभविष्य

मेष : आज कामाच्या ठिकाणी व्यस्तता वाढलेली दिसेल.

वृषभ : आज पैशाशी संबंधित गोष्टी सुरळीत होताना दिसतील.

मिथुन : आज नवीन ओळखी होताना दिसतील. मनात अनेक विचार येतील.

कर्क : आज कुटुंबासोबत वेळ घालवला जाईल.

सिंह : आज कामाला चांगली प्रसिद्धी मिळताना दिसेल.

कन्या : आज कामाची यादी मोठी असलेली दिसेल.

तूळ : आज मैत्रीतील गोडवा वाढलेला दिसेल.

वृश्चिक : आज मन एकाग्र होताना दिसेल.

धनु : आज प्रवासाचा योग दिसत आहे. नवीन शिकण्याची संधी मिळेल.

मकर : आज जबाबदाऱ्या वाढलेल्या दिसतील.

कुंभ : आज मित्र-मंडळींसोबत वेळ घालवला जाईल.

मीन : आज मन शांत आणि प्रसन्न असलेले दिसेल.

फिल्मीचक्कर क्र. १२६३ सौ. शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) नुकताच मरण पावलेला एक प्रसिद्ध अभिनेता ज्याचा मुलगा 'ताल' या चित्रपटाचा नायक आहे ३) जीने की ++ (चित्रपटाचे नाव) ५) +++ तेरी कसम (चित्रपटाचे नाव) ६) प्यार ही ++ (चित्रपटाचे नाव) ८) अमिताभ बच्चन, अजय देवगण, सोनाली बेंद्रे, नफिसा अली, नवीन निश्चल आदींचा एक चित्रपट १०) राजेश खन्नाचा सुरुवातीच्या काळातील एक चित्रपट ११) कल ++ और कल (चित्रपटाचे नाव) १३) ये शाम मस्तानी मदहोश किये जा ++ और डोर ना खिंचे (गाणे) १५) 'राम तेरी गंगा मैली' चित्रपटाचा नायक १६) यात राजेश खन्ना, अमिताभ बच्चन आहेत

उभे शब्द :- १) 'दर्या किनारे एक बंगलो ग पोरी' गाण्यासाठी प्रसिद्ध पावलेला एक दिवंगत अभिनेता २) ++ का रिश्ता (चित्रपटाचे नाव) ३) शेत, जंगल या अर्थाचा एक मराठी शब्द ४) सुनील दत्त, विमी, राजकुमार, मुमताज, बलराज सहानी, मदनपुरी यांचा एक चित्रपट ६) ++ सावन (चित्रपटाचे नाव) ७) अरबी भाषेत देव ९) खलनायक व चरित्र अभिनेता म्हणून प्रसिद्ध पावलेला एक नट १०) चोरी चोरी, श्री-४२०; जिस देश मे गंगा बहती 'है' आदी चित्रपटांचा नायक १२) +++ का महिना पवन करे सोर (गाणे) १४) ++ रांझा (चित्रपटाचे नाव)

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : खरी मैत्री शब्दात नाही तर संकटात कळते.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

फुलांना सुगंध का येतो?

निसर्गाची एक सुंदर आणि शास्त्रीय व्यवस्था फुलांचा सुगंध हा केवळ आपल्या मनाला आनंद देणारा घटक नाही, तर त्यामागे निसर्गाची खूप मोठी आणि शास्त्रीय व्यवस्था दडलेली आहे. फुलांच्या पाकळ्यांमध्ये, पुंकेसराजवळ आणि काही वेळा देठामध्ये विशेष ग्रंथी असतात. या ग्रंथींमध्ये सुगंधी तेले तयार होतात. ही तेले म्हणजे अस्थिर सेंद्रिय संयुगे असतात, जी हवेच्या संपर्कात आल्यावर लगेच वाफ होऊन हवेत पसरतात. त्यामुळेच आपल्याला दूरवरूनही मोगरा, जाई, जुई, गुलाब किंवा रातराणीचा सुगंध जाणवतो. प्रत्येक फुलामध्ये ही संयुगे वेगवेगळ्या प्रमाणात असतात, त्यामुळेच प्रत्येक फुलाचा वास वेगळा असतो. काही फुलांमध्ये टरपीन, काहींमध्ये बेंझिनॉइड, तर काहींमध्ये फिनाईलप्रोपॅनॉइड नावाची संयुगे जास्त प्रमाणात आढळतात. या रासायनिक फरकामुळेच गुलाबाचा गोडसर वास, मोगऱ्याचा तीव्र वास आणि चाफ्याचा मंद वास यात फरक जाणवतो.

फुलांना सुगंध येण्याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे परागीभवन. फुले स्वतःहून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकत नाहीत, त्यामुळे त्यांना परागकण वाहून नेण्यासाठी कीटकांची, पक्ष्यांची आणि वाऱ्याची मदत लागते. सुगंध हा कीटकांना दिलेला एक प्रकारचा संदेश असतो. मधमाशा, फुलपाखरे, भुंगे, पतंग यांना वासाच्या माध्यमातून फूल कोठे आहे हे समजते. कीटक फुलाकडे आल्यावर त्याच्या शरीराला परागकण चिकटतात आणि तो दुसऱ्या फुलावर गेल्यावर ते परागकण तिथे पोहोचतात. अशा प्रकारे फुलांचे फलन होते आणि नवीन बिया तयार होतात. म्हणजेच सुगंध हा फुलांच्या पुनरुत्पादनाचा एक महत्त्वाचा भाग आहे.फुलांचा सुगंध दिवसाच्या वेळेनुसार आणि हवामानानुसार बदलत असतो. सकाळी आणि संध्याकाळी हवा थंड आणि दमट असते, त्यामुळे सुगंधी कण हवेत जास्त वेळ टिकतात आणि वास जास्त जाणवतो. दुपारी उन्हामुळे हे कण लवकर उडून जातात, त्यामुळे वास कमी जाणवतो.

काही फुले दिवसाच फुलतात आणि दिवसाच सुगंध देतात, कारण त्यांना दिवसा फिरणारे कीटक आकर्षित करायचे असतात.

तर रातराणी, निशिगंध, मोगरा यांसारखी फुले रात्री जास्त सुगंध देतात, कारण रात्री फिरणाऱ्या पतंगांना आकर्षित करणे हा त्यांचा उद्देश असतो. पावसाळ्यात हवेतील आर्द्रतेमुळेही फुलांचा सुगंध अधिक दरवळताना जाणवतो.

मानवी इतिहासात फुलांच्या सुगंधाला खूप महत्त्व आहे. प्राचीन काळापासून फुलांचा वापर पूजेसाठी, सजावटीसाठी, औषधांसाठी आणि अत्तर बनवण्यासाठी केला जातो. गुलाब, जाई, मोगरा, चंदन यांपासून अत्तरे आणि सुगंधी तेले तयार केली जातात. सुगंधामुळे मन प्रसन्न होणे, ताण कमी जाणवणे, वातावरणात सकारात्मकता निर्माण होणे असे अनुभव अनेक लोक घेतात. शास्त्रज्ञांच्या मते फुलांचा सुगंध हा केवळ सुंदर अनुभव नाही, तर तो वनस्पती आणि प्राणी यांच्यातील हजारो वर्षांच्या सहजीवनाचा परिणाम आहे. निसर्गाने फुलांना दिलेला हा सुगंध वनस्पतींच्या अस्तित्वासाठी आणि जैवविविधता टिकवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

चहावाल्याची वही

राहुरीच्या बाजारात एका कोपऱ्यात रामभाऊंची छोटीशी चहाची टपरी होती. चहा तर सगळेच प्यायचे, पण रामभाऊंच्या टपरीवर एक वेगळीच परंपरा होती. जो कोणी पहिल्यांदा त्यांच्या टपरीवर चहा प्यायला यायचा, त्याला रामभाऊ एकच प्रश्न विचारायचे, तुझं स्वप्न काय आहे ? लोक हसायचे. कोणी म्हणायचा, मला मोठा अधिकारी व्हायचंय. कोणी म्हणायचा, मला माझ्या आईसाठी घर बांधायचंय. कोणी म्हणायचा, मला फक्त माझ्या लेकरांना शिकवायचंय. रामभाऊ काही बोलायचे नाहीत.

फक्त त्यांची जुनी, फाटकी वही काढायचे आणि त्यात त्या माणसाचे नाव आणि त्याचे स्वप्न लिहून ठेवायचे. वर्षे निघून गेली. टपरीवर येणारे लोक बदलले, पण वही मात्र भरत गेली. काही लोक पुन्हा कधीच टपरीवर आले नाहीत. काही लोक मोठे झाले आणि शहरात गेले.

एक दिवस एक मोठा अधिकारी गाडीतून उतरून टपरीवर आला. रामभाऊंना त्याने नमस्कार केला. रामभाऊंनी त्याला ओळखले नाही. त्या अधिकाऱ्याने खिशातून एक जुनी वही काढली नाही, तर रामभाऊंनीच वही काढली. त्यात लिहिले होते, वर्ष १९९८, नाव - प्रकाश, स्वप्न - मोठा अधिकारी होऊन गावासाठी शाळा बांधायची आहे. प्रकाशचे डोळे भरून आले.

तो म्हणाला, रामभाऊ, तुम्ही माझे स्वप्न विसरला नाहीत, म्हणून मी माझे स्वप्न विसरलो नाही. आज मी तुमच्यामुळे अधिकारी झालोय. रामभाऊ हसले आणि म्हणाले, मी फक्त लिहून ठेवले होते. स्वप्न पूर्ण करायला मेहनत तुझीच होती. त्या दिवशी टपरीवरच्या सगळ्यांना कळले, रामभाऊंची वही म्हणजे फक्त वही नव्हती, तर गावभरच्या स्वप्नांना जपणारे एक मंदिर होते.

तात्पर्य - प्रत्येक माणसाचे स्वप्न हे लहान नसते. कोणीतरी ते ऐकून जपून ठेवले, तर माणूस आपले स्वप्न कधीच विसरत नाही.

आत्मशक्ति



स्वतःला वाचविण्यासाठी उपाय शोधण्यात आमचा वेळ खर्च होतो. एक खोटे झाकण्यासाठी शंभरदा खोटे बोलावे लागते. आमचा खोटेपणा उघडा होऊ नये म्हणून आम्हाला कोणाशी काय बोललो ह्याचे भान ठेवावे लागते. त्यामुळे आमच्या मनात नेहमी भय आणि चिंता घर करते व ते भजन अभ्यासाचे वेळी आम्हाला त्रस्त करते. जर आम्ही नेहमी सत्य बोललो तर कोणाचीही भिती बाळगण्याचे कारण नाही. आम्ही मजेत झोपू शकतो आणि आनंदाने भजन अभ्यासास बसू शकतो.आमच्या जीवनातून खोटेपणा दूर करण्याचे अनेक मार्ग आहेत.

अध्यात्मिक शक्ती

आम्ही पूर्णपणे ध्यानात ठेवले पाहिजे की आम्ही एखादी गोष्ट दुसऱ्यापासून काही काळ लपवू शकतो. परंतु परमेश्वर तर आमचे कर्म जाणून असतो व ते कर्म आमच्या हृदयावर कायमचा ठसा सोडते. आम्ही जे काही करतो ते परमेश्वरापासून लपवू शकत नाही. आम्ही दुसऱ्याच्या डोळ्यात काही काळपर्यंत धूळ झोकू शकतो.

परंतु परमेश्वर सत्य आहे व खोटेपणा तर परमेश्वरापासून दूर नेतो. आम्ही विचार करतो की अमूक माणसापासून बचावलो पण पुढे जाऊन तो माणूस आमचा खोटेपणा ओळखेल. जर आम्ही काहीही करण्याअगोदर विचार केला तर नंतर होणाऱ्या परिणामापासून आम्ही वाचू शकतो.

जर आम्ही चैतन्यशील मार्ग स्विकारला तर आमच्या मार्गात कोणताही अडथळा आणण्याची आम्ही इच्छा करणार नाही. जर आम्हाला कळते की, खोटेपणाचा मार्ग आम्हाला दुसऱ्याचा गुलाम बनवील तर आम्ही खोटे बोलण्यापूर्वी, चोरी करण्यापूर्वी, धोकेबाजी करण्यापूर्वी दोन वेळा विचार करू. खोटे बोलण्याने आम्ही आत्मा आणि परमात्म्याची सेवा करीत नाही तर खोटे बोलण्याची सेवा करतो. खोटेपणा झाकण्यासाठी आम्ही घालविलेला वेळ आमच्या मनाचा समतोलपणा नष्ट करील. मनाचे हे समतोलत्व (क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : काही पालक त्यांनी विवाहित आयुष्यात जसे निर्णय घेतले तसेच मुलांनीही घ्यावेत असं सांगतात. पण त्या दोघांसाठी परिस्थिती वेगळी असू शकते.

शिवानीदीदी : हो, पालक आणि मुलं यांचे संस्कार आणि कार्मिक खाती वेगवेगळी असू शकतात. त्यामुळे एकमेकांसाठी निर्णय घेऊ नये. जेव्हा कोणी आपल्याकडे सल्ला घ्यायला येतं तेव्हा आपल्याला स्वतःचा अभिमान वाटतो, छान वाटतं आणि मग आपण प्रकरणावर फार विचार करायच्या आधीच आपलं मत मांडून मोकळे होते. सल्ला घ्यायला आलेल्या व्यक्तीचं मन त्या वेळी कमकुवत असतं. तिला स्वतःसाठी निर्णय घ्यायचा नसतो म्हणून इतर कोणीतरी तिच्यासाठी हे काम करावं असं तिला वाटतं. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या व्यक्तीला त्या निर्णयाची जबाबदारी स्वतःवर घ्यायची नसते.

नाती घट्ट विणू या

म्हणूनच आपण खूप काळजीपूर्वक राहायला हवं. जेव्हा आपण त्या व्यक्तीबाबतचे निर्णय तिच्यावरच सोडतो, तेव्हा ती उपाय शोधण्यासाठी प्रयत्न करते. सरतेशेवटी, तिचं कार्मिक खातं आणि संस्कार तिला योग्य निर्णय घेण्याच्या दिशेने प्रवृत्त करतील.

सुरेश ओबेरॉय : विश्वही मदत करेल.

शिवानीदीदी : आपण एकमेकांकडून जे विचार आणि ऊर्जा प्राप्त करतो ते म्हणजेच विश्व. बरोबर निर्णय घेण्यासाठी आपण आपल्या अंतःप्रेरणेची मदत घेऊ शकतो. जसं प्रेम हा आपला सहज स्वभाव आहे, त्याचप्रमाणे विवेक हासुद्धा आत्म्याचा उपजत गुण आहे. तथापि, आपण आपल्या मूळ प्रज्ञेवर अनेक आवरणं चढवली आहेत.

सुरेश ओबेरॉय : आपल्यापेक्षा इतर लोक अधिक समजूतदार आहेत, त्यांचा सल्ला घेणंच योग्य ठरेल असा विचार करून आपणच अनेकदा स्वतःचं खचीकरण करतो. असं करण्याने आपलं सामर्थ्य आपण इतरांना देतो.

शिवानीदीदी : भलेही आपण महात्मा किंवा संतांकडे गेलो तरी त्यांचे आशीर्वाद घेऊ, त्यांना सल्ला मागू पण निर्णय हा आपलाच असायला हवा. याचं कारण, तेदेखील त्यांचा विवेक, संस्कार आणि क्षमता यांनुसारच निर्णय घेतील. समजा, त्यांनी आपल्या क्षमतांनुसार निर्णय घेतला तरीही त्याची अंमलबजावणी करणारे आपणच असणार आहोत. त्यामुळे त्यांचा सल्ला ऐकल्यानंतरही तो लगेचच अंमलात आणला पाहिजे हे गरजेचं नाही. त्यांचा सल्ला ऐकल्यानंतर घरी जाऊन त्यावर काही दिवस विचार करणं जास्त योग्य होईल. (क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, मी जाड दिसते का?
नवरा : अगं नाही गं, तू तर खूप छान दिसतेस!
बायको : मग माझी जीन्स घट्ट का होतेय?
नवरा : अगं, जीन्सलाही तुझ्यावर प्रेम वाढलंय, म्हणून तुला सोडत नाहीये!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* संयुक्त राष्ट्र संघटनेचे मुख्यालय कोठे आहे?

- न्यूयॉर्क

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

म्हणून भाज्या दोन ते तीन वेळा पाण्याने स्वच्छ धुवून खाव्यात. आपल्या देशात याच वर्षी शास्त्रज्ञांनी केलेल्या परिक्षणानुसार असे लक्षात आले की, नवीन पीक किंवा किटकनाशकयुक्त भाजीपाला बाजारात येत असल्यामुळे या काळात गर्भस्थ बाळाच्या मेंदूची वाढ चांगली होताना दिसून येत नाही. तसेच अशी मुले मतीमंद किंवा इतर शारीरिक व्यंगांनी युक्त होतात. असे होऊ नये म्हणून गर्भवतीने नवीन धान्या ऐवजी जुने धान्य वापरावे व बाहेरच्या अन्नाऐवजी घरचे सात्त्विक जेवण घेऊन योग्य आहार विहाराकडे लक्ष द्यावे. उदा. भाज्यांचे गरम सूप, फळांचे ज्यूस, नारळाचे पाणी घ्यावे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेऊ नयेत.

मातृजं ह्यस्य हृदयं मातुश्च हृदयेन तत् । सम्बद्धं तेन गर्भिण्या नेष्टं श्रद्धाविधारणम् ।।म्हणजे गर्भाचे हृदय हे मातेच्या अंशापासून होते व त्याचा मातेच्या हृदयाशी संबंध असतो; म्हणून गर्भवतीचे डोहाळे पुरवायला हवेत. आजच्या विज्ञानयुगात चौरस आहार म्हणजेच आहार घेईल तो बाळाला मिळतो. जन्माला आल्यानंतर बाळाला कोणीही भरविले तरी चालते; परंतु गर्भस्थ बाळाची वाढ आईशिवाय कोणीही करू शकत नाही. म्हणूनच डोहाळे म्हणजे बाळाला झालेली खाण्याची इच्छा; जी तो आईच्या माध्यमातून मागवितो हेच वाग्भटांनी सांगितले आहे. संत एकनाथांनी भावार्थ रामायण या ग्रंथातील नवव्या अध्यायात गर्भ दुःखाचे वर्णन करताना म्हटले आहे की, माता जेव्हा कडू, आंबट, खारट पदार्थ खाते तेव्हा गर्भाचे सर्वांग होरपळले जाते. अशा वेळी ते एकाकी असते, तेथे भिऊ नकोस असे म्हणणारे, आश्वासन देणारे कोणीही नसते. त्वचा नाही गर्भखोळे । तंव मातेसी होती डोहाळे । कटवम्ललवण सेवी ते वेळे । सर्वांग होरपळे गर्भाचे ।।३१।।त्रिकाळभोजनमातेसी।त्रिकाळदुःखतेगर्भासी। भोगिता होय कासाविसी । कोणापासी सांगेल ।। ३२ ।।तेथे नाही वायुचे आगमन । नाही मायदाईचे शांतवन । नाही स्वजनाचे समाधान ।

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००





नगर जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने संभाजी महाराज कुस्ती केंद्रात १५ व २० वर्षे वयोगटातील फ्रीस्टाइल व ग्रीको रोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी आयोजित निवड चाचणी. (छायाचित्र : लहू दळवी)

जिल्हास्तरीय निवड चाचणीत फ्रीस्टाइल तसेच ग्रीको रोमन स्पर्धांसाठी कुस्तीपटूंचा सहभाग

अहिल्यानगरमध्ये डिसेंबरमध्ये राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेचे आयोजन

नगर– अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने भिस्तबाग, पवननगर येथील संभाजी महाराज कुस्ती केंद्रात १५ व २० वर्षे वयोगटातील फ्रीस्टाइल व ग्रीको रोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणी झाली. या निवड चाचणीत १५ वर्षे वयोगटात १०९, तर २० वर्षे वयोगटात ८२ अशा एकूण १९१ कुस्तीपटूंनी सहभाग नोंदविला. मॅटवर रंगलेल्या चुरशीच्या लढतींमुळे उपस्थितांना कुस्तीचा थरार अनुभवायला मिळाला.

आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली डिसेंबर महिन्यात अहिल्यानगर शहरात राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारा संघ निवडण्यासाठी ही चाचणी घेण्यात आली. जिल्ह्यातील युवा कुस्तीपटूंना राज्यस्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी, हा या निवड चाचणीमागील उद्देश आहे.

यावेळी जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव पैलवान संतोष भुजबळ म्हणाले की, खेळाडू हा स्पर्धांच्या माध्यमातून घडत असतो. त्याला आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. डिसेंबर महिन्यात ही स्पर्धा पार पडणार आहे.

जिल्ह्यातून चांगले कुस्तीपटू निर्माण

अहिल्यानगर जिल्ह्यातून चांगले कुस्तीपटू निर्माण होत आहेत. मात्र, त्यांना योग्य मार्गदर्शन आणि सातत्याने स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. कुस्तीपटूंच्या कौशल्याला वाव देण्यासाठी वारंवार स्पर्धांचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. जिल्हा कुस्तीगीर संघाचे खजिनदार पैलवान शिवाजी चव्हाण म्हणाले की, संभाजी महाराज कुस्ती केंद्रात जिल्हास्तरीय फ्रीस्टाइल व ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धेची निवड चाचणी उत्साहात पार पडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील १९१ कुस्तीपटूंनी सहभाग घेतला. कुस्तीपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांचे सहकार्य लाभत आहे.

राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी करावी

अहिल्यानगर जिल्ह्यातून जास्तीत जास्त कुस्तीपटू निर्माण व्हावेत आणि त्यांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे नाव उंचावावे, या उद्देशाने जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध वजन गटांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे, असे त्यांनी नमूद केले. या निवड चाचणीप्रसंगी कुस्तीगीर संघाचे सचिव पैलवान संतोष भुजबळ, खजिनदार पैलवान शिवाजी चव्हाण, नितीन आव्हाड, निलेश मदने, पैलवान संग्राम शेळके, प्रमोद गोडसे, शंकर खोसे, युवराज चव्हाण आदींसह खेळाडू, पालक आणि कुस्तीप्रेमी उपस्थित होते.

'किल्ला बनवा स्पर्धेमध्ये' मातीच्या सिंहगड किल्ल्याला द्वितीय क्रमांक



नगर – राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या 'किल्ला बनवा स्पर्धा २०२६' चा निकाल जाहीर झाला. यामध्ये अहिल्यानगर मध्यवर्ती भागातील बागडपट्टी येथील विघ्नहर्ता प्रतिष्ठान, बागडपट्टी, अहिल्यानगर या मंडळाच्या बाल सभासदांनी बांधलेल्या १८X१२ फूट आकाराच्या मातीच्या सिंहगड किल्ल्याला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. निकाल जाहीर होताच उपमहापौर धनंजय जाधव यांनी फोन करून सर्व बाल सभासदांचे कौतुक करून अभिनंदन केले. त्यानंतर बाल सभासदांनी जल्लोषात मिरवणूक काढून किल्ल्याभोवती १०१ दिवे लावून त्रिपुरारी पौर्णिमा उत्साहात साजरी केली.

सदर किल्ल्याचे अनावरण १४ नोव्हेंबर जागतिक बाल दिना निमित्त धनंजय जाधव व बाल सभासद यांच्या हस्ते करण्यात आले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे विशेष म्हणजे, या सर्व कार्यक्रमाचे नियोजन सर्व बाल सभासदांनीच केले होते.

यावेळी बोलताना उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले, दिवाळीमध्ये किल्ला तयार करणे हा उपक्रम सर्व लहान मुलांना मोबाईलच्या विश्वातून बाहेर काढून आपल्या धर्माची, संस्कृतीची आणि इतिहासाची जवळून ओळख करून देण्याचा उत्तम असा प्रयत्न आहे. लहान मुले ही भारताचे भविष्य आहेत, त्यांना संस्कृतीची जोपासना देणे ही काळाची गरज आहे. आज बागडपट्टी येथे ज्या प्रकारे बाल गोपालांनी किल्ला बनविला आहे, तो येत्या काळात नगरकरांसाठी प्रेरणा देणारा असा ठरेल. असे सर्व बाल सभासदांना खाऊचे वाटप करून त्यांच्या सोबत फटाके फोडून त्यांचे आणि मंडळातील सभासदांचे कौतुक केले.

मंडळाचे अध्यक्ष शिवराज धोत्रे आणि मार्गदर्शक आनंद वल्लाकटी यांनी भावनिक प्रतिक्रिया देताना सांगितले, आमच्या मंडळातील सर्व बाल सभासदांनी मिळून सर्व नैसर्गिक आणि टाकाऊ वस्तूंपासून अथक परिश्रमातून हा किल्ला बांधला. कोणी माती आणली, कोणी दगड रचले, कोणी बुरुज बनवले, कोणी झेंडे लावले. यांच्या छोट्या हातांनी खूप मोठे काम केलेय. आज गल्लीत एक किल्ला नाही, तर एक जिवंत मंदिर उभे राहिलेय

मंडळाचे बाल सभासद युवराज धोत्रे, आदी वल्लाकटी, मयूर रावळ, यश दासी, स्वरूप दुधाटे, श्रेयस विद्ये, दिव्यम बायड, पियुष कुंटला, वरुण चन्ना, मानसी रावळ, तनया क्यादर, रक्षा बायड, विराज बोडखे, त्रिवेद अमृतवाड, इरा क्यादर, वेदांतिका बल्लाळ, अनघा सुपेकर, मान्यता बायड, स्नेहा गोसाके, परी वल्लाकटी यांचा सत्कार करण्यात आला.

नगरमध्ये २७ नोव्हेंबरला ग्रंथ प्रकाशन सोहळा



नगर – अहिल्यानगरचे ज्येष्ठ विधीतज्ञ ॲड. डी.डी.घोरपडे यांनी भारतीय संस्कृतीचा इतिहास अत्यंत सोप्या भाषेत लिहून यामध्ये ४ वेद, ११ उपनिषदे, रामायण, महाभारत, ६ शास्त्र व १८ पुराणे, सर्व संप्रदाय तसेच पंथ भागवत धर्मातील संतांची संक्षिप्त माहिती यामध्ये दिलेली आहे. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा. नगर – छत्रपती संभाजीनगर – रोडवरील चेतना लॉन येथे ग्रंथ प्रकाशन सोहळा पार पडणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, पुणे येथील ८९ वे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे. यावेळी जेष्ठ संत साहित्य अभ्यासक प्राचार्य डॉ.शिरीष लांडगे, संत साहित्याचे गाढे अभ्यासक व विचारवंत सद्गुरु साहेबराव आवारे, खा. निलेश लंके, आ.संग्राम जगताप, आ.विक्रम पाचपुते, आ.हेमंत ओगले, महापौर ज्योतीताई गाडे तसेच नगरसेवक, लेखक, साहित्यिक, अभ्यासक, उपस्थित राहणार आहेत. या ग्रंथ प्रकाशन सोहळ्यासाठी नगरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन ॲड. घोरपडे यांनी केले आहे.

डॉ. राजेंद्र प्रसाद राज्यस्तरीय पुरस्काराने योगसेवक रामचंद्र लोखंडे यांचा गौरव

जळगाव येथे झाला सन्मान; योग आणि ध्यानाच्या माध्यमातून केलेल्या निस्वार्थ कार्याची दखल

नगर – योग आणि ध्यानधारणेच्या माध्यमातून समाजामध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण करण्याबरोबरच व्यसनमुक्त पिढी घडविण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेले भिंगार, अहिल्यानगर येथील योगसेवक रामचंद्र बाबुराव लोखंडे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक व योगसेवेबद्दल डॉ. राजेंद्र प्रसाद राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जळगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्यात आला.

रामचंद्र लोखंडे हे गेल्या अनेक वर्षांपासून योग, प्राणायाम आणि ध्यानधारणेच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्य करीत आहेत. केवळ शारीरिक आरोग्य सुधारणे एवढाच मर्यादित उद्देश न ठेवता, मानसिक स्वास्थ्य, आत्मविश्वास आणि सकारात्मक जीवनशैली विकसित करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. योग ही निरोगी जीवनाची गुरुकिल्ली असून प्रत्येक वयोगटातील व्यक्तीने दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करावा, हा संदेश ते आपल्या कार्यातून देत आहेत.



रामचंद्र बाबुराव लोखंडे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक व योगसेवेबद्दल डॉ. राजेंद्र प्रसाद राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आजच्या बदलत्या जीवनशैलीत तरुणाईमध्ये वाढणारे व्यसनाधीनतेचे प्रमाण ही चिंतेची बाब बनली आहे. या पार्श्वभूमीवर युवक-युवतींमध्ये व्यसनांपासून दूर राहण्याची जाणीव निर्माण करून त्यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविण्याच्या उद्देशाने लोखंडे विविध ठिकाणी योग व ध्यानधारणेची शिबिरे घेतात. वयोवृद्ध, महिला, विद्यार्थी आणि तरुण अशा समाजातील विविध घटकांना ते विनामूल्य योगाचे प्रशिक्षण देतात. योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक शांतता आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते, याबाबत ते मार्गदर्शन करतात. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेत अनेकांनी नियमित योगाभ्यासाला सुरुवात केली असून आरोग्याच्या दृष्टीने सकारात्मक बदल अनुभवले आहेत. त्यांनी केलेल्या या निःस्वार्थ कार्याची दखल घेऊन त्यांना डॉ. राजेंद्र प्रसाद राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले असल्याची माहिती फारुक शहा यांनी दिली.

नागापूर एमआयडीसीत केबी अरेना स्पोर्टस् क्लबचा शुभारंभ



केबी अरेना स्पोर्ट्स क्लबचे उद्घाटन करताना आ. संग्राम जगताप. (छायाचित्र : लहू दळवी)

नगर – नागापूर एमआयडीसी येथे केबी अरेना स्पोर्ट्स क्लबचा उद्घाटन सोहळा आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला. या परिसरातील सर्वात मोठे टर्फ म्हणून केबी अरेनाची उभारणी करण्यात आली असून, येथे क्रिकेट, फुटबॉल, स्केटिंग यांसारख्या खेळांचे प्रशिक्षण आणि विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याला आचार्य वाल्हेराज बाबा बिडकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, नवनाथ कातोरे, करण कराळे, वडगाव गुप्ता गावचे सरपंच विजय शेवाळे, ह.भ.प. तुकाराम महाराज कातोरे, दत्तात्रय कातोरे, एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हेमंत थोरात, लक्ष्मण कातोरे, आप्पासाहेब बोवके, सुनील बर्डे, संचालक राहुल कातोरे, शुभम बर्डे आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

खेळामुळे विचार करण्याची क्षमता विकसित

यावेळी आ. जगताप म्हणाले की, क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून चांगला विद्यार्थी घडत असतो. खेळामुळे विद्यार्थ्यांची विचार करण्याची क्षमता विकसित होते. मात्र, दिवसेंदिवस शालेय विद्यार्थी मैदानी खेळांपासून दूर जाऊन मोबाईलच्या दुनियेत रमू लागले आहेत. अशा परिस्थितीत शहरातील टर्फ आणि स्पोर्ट्स क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुन्हा मैदानी खेळांकडे वळविण्याचे काम होत आहे.

मैदानी खेळातूनच चांगला खेळाडू निर्माण होतो

क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून चांगला खेळाडू निर्माण होत असतो. खेळताना सर्वजण एकत्र येतात, विचारांची देवाण-घेवाण होते आणि एकमेकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होतात. पालकांनाही आपल्या पाल्याची क्रीडा क्षेत्रातील प्रगती पाहून आनंद वाटतो. आपला मुलगा योग्य दिशेने करिअर घडवत असल्याचे समाधान त्यांना मिळते. आज क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे खेळाडूंनी आपल्या आवडीच्या खेळाची निवड करून जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. मैदानी खेळातूनच चांगला खेळाडू निर्माण होतो, असे प्रतिपादन आ. जगताप यांनी केले.

युवकांचे आरोग्य सुदृढ

यावेळी केबी अरेनाचे संचालक राहुल कातोरे म्हणाले की, नागापूर एमआयडीसी परिसरातील युवकांना केबी अरेना स्पोर्ट्स क्लबच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या ठिकाणी क्रिकेट, फुटबॉल, स्केटिंग यांसारख्या खेळांचे प्रशिक्षण देण्याबरोबरच विविध स्पर्धांचे आयोजन करता येणार आहे. परिसरातील चांगले खेळाडू घडावेत, त्यांना योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळावे, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. खेळाच्या माध्यमातून युवकांचे आरोग्य सुदृढ आणि निरोगी राहण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



राज्यस्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धामध्ये नगरच्या साई एंजल इंटरनॅशनल स्कूलच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी करत एकूण ७ पदके पटकावली.

साई एंजल इंटरनॅशनल स्कूलच्या खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



शंभुराजे सावंत

नगर – मणेराजुरी, तासगाव (सांगली) श्री लक्ष्य सैनिक स्कूल, मणेराजुरी येथे झालेल्या राज्यस्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धामध्ये नगरच्या साई एंजल इंटरनॅशनल स्कूलच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी करत एकूण ७ पदके पटकावली. या खेळाडुंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेत शंभुराजे सावंत, विरेन आधाट आणि आर्यन नवघरे यांनी सुवर्ण पदक पटकावले. तर कार्तिक जगताप याने २ कांस्य पदके आणि शौर्य कारामुंगे याने १ कांस्य पदक पटकावले.

या यशासाठी खेळाडूंना प्राचार्या पल्लवी जोशी, स्वप्निल सर, प्रशिक्षक गौरव घोडके व जयेश शिरसाठ यांचे मार्गदर्शन लाभले.



स्व.पै.किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, आयोजित ९ व्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात प्राचार्या प्रा. अनुरिता झगडे यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्काराने सन्मानित करताना पै. नाना डोंगरे आदी.

हिरकणी पुरस्काराने नगर येथील प्रा. अनुरिता झगडे यांचा सन्मान

नगर – महिला अत्याचार विरोधी कार्य आणि प्रेरणादायी समुपदेशनाच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा. अनुरिता झगडे यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

निमगाव वाघा (ता. नगर) येथील स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व पै.नाना डोंगरे व्यायाम शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ९ व्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात हा पुरस्कार वितरण सोहळा झाला. नवरात्र उत्सवानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यासाठी या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. परिवार मंगल कार्यालय, निमगाव वाघा येथे झालेल्या या सोहळ्यात महिला संरक्षण, महिला अत्याचार विरोधी जनजागृती आणि महिलांमध्ये धाडस निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी व्याख्याने देणाऱ्या प्रा. झगडे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बळीराजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी श्रीगोंदा येथे २७ नोव्हेंबर रोजी सेंट्रल बँकेतर्फे 'कृषी कर्ज मेळावा'

नगर – शेतकऱ्यांच्या शेतीपूरक उद्योग व्यवसायांना बळ देऊन शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती सुधारावी उद्देशाने 'सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर च्या वतीने २७ नोव्हेंबर रोजी घारगाव या. श्रीगोंदा येथे राष्ट्रव्यापी कृषी कर्ज आऊटरीच कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. कृषी क्षेत्राला वेळेत कर्जपुरवठा, गरजेनुसार आर्थिक उपाययोजना आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे सेंट्रल बँक ऑफ इंडिया चे क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे यांनी सांगितले.

या शिबिरामध्ये शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, वाहन खरेदी, शेती अवजारे तसेच बचत गटांतील महिला उद्योजकांसाठी विविध आकर्षक कर्ज योजनेचा लाभ मिळणार आहे.

सेंट एसएचजी एनआरएलएम स्वयंसाहाय्यता गटांना (एसएचजी) रिव्हॉल्व्हिंग कॅश क्रेडिट किंवा मुदती कर्जाच्या माध्यमातून २० लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध होणार असून, व्याजदर ७.०० टक्के आहे. सेंट फूड प्रोसेसिंग राइस मिल क्लस्टर तांदूळ गिरण्या आणि तांदूळ प्रक्रिया प्रकल्पांसाठी कमाल १०० कोटी रुपयांपर्यंत कर्ज सुविधा दिली जाणार असून, व्याजदर ७.७५ टक्क्यांपासून सुरू होतो.

सेंट फूड प्रोसेसिंग प्लस स्कीम: राइस मिल, तेल गिरणी, डाळ मिल, दूध व दुग्धजन्य पदार्थ तसेच इतर अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी कमाल १०० कोटी रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य मिळणार असून, स्पर्धात्मक व्याजदर ८.०० टक्के ठेवण्यात आला आहे.

सेंट किसान वाहन स्कीम अंतर्गत दुचाकी, चारचाकी यांसारख्या नवीन वाहनांच्या खरेदीसाठी कमाल २५ लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळणार असून, व्याजदर ९.०० टक्क्यांपासून सुरू आहे.

सेंट फार्म स्कीमच्या माध्यमातून शेती अवजारांची खरेदी आणि देखभालीसाठी मुदती कर्ज उपलब्ध असून, आकर्षक व्याजदराचा लाभ घेता येणार आहे.

नारी शक्ती या स्कीमच्या माध्यमातून स्वयंसाहाय्यता गटातील महिला सदस्यांना उद्योजिका म्हणून पुढे येण्यासाठी आकर्षक व्याजदरात कमाल ५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत मिळणार असून, सर्व कर्ज योजनांसाठी बँकेचे नियम व अटी लागू राहणार असून,

अधिक माहितीसाठी www.centralbank.bank.in या संकेतस्थळाला भेट देण्याचे अथवा जवळच्या शाखेशी संपर्क साधण्याचे आवाहन बँकेतर्फे करण्यात आले आहे.



संगमनेर येथे झालेल्या पुणे विभागीय शालेय योगासन स्पर्धेत अहिल्यानगर मनपा संघातील तेजस्विनी शेळके, भार्गवी कराळे यांना सुवर्णपदक व शौर्य देशपांडे आणि रिदम भंडारी यांनी कास्यपदक मिळवले.

पुणे विभागीय शालेय योगासन स्पर्धेत एम एम वाय टी सी च्या खेळाडूंचे यश

नगर – संगमनेर येथे झालेल्या पुणे विभागीय शालेय योगासन स्पर्धेत अहिल्यानगर मनपा संघातील तेजस्विनी शेळके, भार्गवी कराळे यांना सुवर्णपदक व शौर्य देशपांडे आणि रिदम भंडारी यांनी कास्यपदक मिळवले. तसेच सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय योगासन स्पर्धेसाठी पुणे विभागाच्या संघात तेजस्विनी शेळके आणि भार्गवी कराळे यांची निवड झाली.

वरील खेळाडू अहिल्यानगर शहरातील एम एम वाय टी सी या योग संस्थेत योगासनखेळाचा सराव करतात अशी माहिती संस्थेचे मुख्य प्रशिक्षक उमेश झोटिंग यांनी दिली. हे खेळाडू प्रवीण पाटील प्रणिता तरोटे आप्पा लाडाने अक्षय पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. याप्रसंगी श्री रामावतार मानधनाचा चॅरिटेबल ट्रस्ट चे ट्रस्टी मोहन मानधना, अहिल्यानगर जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनची अध्यक्ष संजय मालपाणी, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा अधिकारी प्रियंका खिंडरे यांनी खेळाडूचे अभिनंदन केले.





श्री अय्यप्पा मंदिरात कार्तिक पौर्णिमेला हजारो दिवे प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा करण्यात आला. तसेच मंडल, मकरविलक्कु उत्सवानिमित्त बीटीआरचे कर्नल वाय.एम.गायकवाड यांनी सपत्नीक मंडल पूजा केली. यावेळी श्री अय्यप्पा सेवा समितीचे उपाध्यक्ष राजू लक्ष्मण व सचिव वसंत सिंग यांनी त्यांचा सन्मान केला.

भगवान श्री अय्यप्पा मंदिरात मंडल मकरविलक्कु वार्षिक महोत्सवास प्रारंभ

६० दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन; कार्तिक पौर्णिमेनिमित्त दीपोत्सवाच्या हजारो दिव्यांच्या प्रकाशाने उजळले अय्यप्पा मंदिर

नगर – केरळमधील प्रसिद्ध शबरीमाला अय्यप्पा मंदिराप्रमाणे अहिल्यानगरच्या श्री अय्यप्पा मंदिरातही मंडल, मकरविलक्कु या वार्षिक उत्सवास भक्तिपूर्वक प्रारंभ झाला. हा उत्सव १४ जानेवारी २०२७ मकर संक्रांतीपर्यंत चालणार आहे. यानिमित्ताने पुढील ६० दिवस दररोज श्री अय्यप्पास्वामी मंदिरात विविध धार्मिक व पारंपरिक उपक्रमांचे आयोजन केले आहे, अशी माहिती श्री अय्यप्पा सेवा समितीचे अध्यक्ष बाबू टायरवाले यांनी दिली.

यानिमित्ताने संरक्षण विभागाच्या बीटीआरचे कर्नल वाय.एम.गायकवाड यांनी सपत्नीक मंडल पूजा करून भगवान श्री अय्यप्पा स्वामींचे दर्शन घेतले. यावेळी बीटीआरचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अय्यप्पा मंदिराचे पुजाऱ्यांनी कर्नल गायकवाड यांना प्रसाद देऊन श्री अय्यप्पा सेवा समितीचे उपाध्यक्ष राजू लक्ष्मण व सचिव वसंत सिंग यांनी त्यांचा सन्मान केला. यावेळी मंदिराचे ट्रस्टी उपस्थित होते.

मंगळवारी कार्तिक पौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त भगवान श्री अय्यप्पा मंदिरात हजारो दिवे प्रज्वलित करून भक्तिभावाने दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मंदिर परिसरात आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई करून शेकडो समया व हजारो पणत्या प्रज्वलित करून त्यांच्या प्रकाशाने मंदिर परिसर उजळून निघाला होता. भक्तिमय वातावरणामुळे मंदिर परिसरात मंगलमय व प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते. 'स्वामीये शरणम अय्यप्पा'च्या जयघोषात भाविकांनी या दीपोत्सवात सहभाग घेतला. अय्यप्पा सेवा समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भाविकांची दर्शनाची व महाप्रसादाची व्यवस्था केली होती.

कार्तिक स्वामींचे बंधू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भगवान श्री अय्यप्पा स्वामींच्या दर्शनाला कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी विशेष महत्त्व आहे. त्यामुळे या मंगलदिनी भाविकांनी मोरपीस अर्पण करून अय्यप्पा स्वामींच्या दर्शनास गर्दी केली होती. यावेळी बाबु टायरवाले, उपाध्यक्ष राजू लक्ष्मण, सचिव वसंत सिंग, सहसेक्रेटरी उदय कुमार, खजिनदार पी. सत्यन, सदस्य पी.सी. श्रीधरन. वेणू गोपाल, के. शंकर, लीबेश नायर, अरुण नायर व व्ही.रवीन्द्रन आदींसह हजारो भाविक उपस्थित होते.

'विजय शंकर महादेव' मंदिरामध्ये कार्तिक स्वामी जन्मोत्सव उत्साहात

एक हजार एक दिव्यांच्या भव्य दीपोत्सवाने मंदिर परिसर उजळला





नगर – स्टेट बँक रोडवरील जीपीओ कार्यालयासमोरील श्री विजय शंकर महादेव मंदिरात कार्तिक स्वामी जन्मोत्सव उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. वर्षातून केवळ एकदाच कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी कार्तिक स्वामींचे दर्शन होत असल्याने पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांनी मंदिरात गर्दी केली होती.

यानिमित्त कार्तिक स्वामी महाराजांना महाअभिषेक व जलाभिषेक करण्यात आला. पहाटे पुजारी राजेंद्र राजमाने यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. दिवसभर भाविकांनी कार्तिक स्वामींचे दर्शन घेतले. माधुरी साखला यांनी कार्तिक स्वामींची आकर्षक रांगोळी रेखाटली होती.

सायंकाळी त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त मंदिरात दीपोत्सव साजरा करण्यात आला. एक हजार एक दिव्यांच्या पणत्या प्रज्वलित करण्यात आल्याने मंदिर परिसर दिव्यांच्या लखलखाटाने उजळून निघाला. यानंतर कार्तिक स्वामींची महाआरती करण्यात आली. महाआरतीनंतर तुलसी विवाह सोहळाही उत्साहात पार पडला.

या धार्मिक सोहळ्याप्रसंगी पुजारी राजेंद्र राजमाने, ॲड. महेश तवले, संजय सावंत, रामदास नवसुपे, अनिल कचकल, अजय नामदे, घुपधरे, विष्णू पवार, जीवाप्पा संभाजी आहेर, नंदू चोथे, संजय बहिरवाडे, महादू काटकर, वनाजी गोडळकर, माधुरी साखला, संगीता राजमाने आदींसह भाविक उपस्थित होते.

बोले सो निहाल... सत श्री अकालच्या जयघोषाने तारकपूरमध्ये भक्तीचा जागर

भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथे गुरुपुरबनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



नगर – बोले सो निहाल... सत श्री अकालचा जयघोष, पारंपरिक वाद्यांचा निनाद, गुरुबाणीचे स्वर आणि भक्तिमय वातावरण... अशा मंगलमय वातावरणात अहिल्यानगर शहरात शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी यांची ५५७ वी जयंती अर्थात गुरुपुरब उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. गुरुनानक देवजींच्या विचारांचा जयघोष करीत शीख, पंजाबी व सिंधी समाजबांधवांनी काढलेल्या भव्य प्रभात फेरीने तारकपूर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. यावेळी आहुजा परिवाराच्या वतीने प्रभात फेरीतील भाविकांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

२४ नोव्हेंबर रोजी सकाळी तारकपूर येथील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथून पारंपरिक वाद्यांच्या गजरात प्रभात फेरीला प्रारंभ झाला. यामध्ये शीख, पंजाबी व सिंधी समाजातील पुरुष, महिला आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात धार्मिक ध्वज, मुखी गुरुबाणी आणि ओठांवर गुरुनानक देवजींचा जयघोष करीत भाविकांनी संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले.

तारकपूर परिसरातून मार्गक्रमण करीत प्रभात फेरी टॉपअप पेट्रोल पंप येथे पोहोचली असता जनक आहुजा परिवाराच्या वतीने तिचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रभात फेरीतील वाहनावर विराजमान असलेल्या गुरुनानक देवजींच्या प्रतिमेवर तसेच धार्मिक पोथीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. गुरुनानक देवजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित भाविकांनी सामुदायिक अरदास (प्रार्थना) करीत सर्वांच्या सुख, समृद्धी, आरोग्य आणि शांततेसाठी प्रार्थना केली. या स्वागत सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

याप्रसंगी जनक आहुजा, इंद्रजीत नय्यर, राजेंद्र कंत्रोड, बृजमोहन कंत्रोड, हरजितसिंह वधवा, बबलू आहुजा, रिकी कंत्रोड, संजय आहुजा, दिनेश कंत्रोड, जतिन आहुजा, अभिमन्यू नय्यर, किशोर कंत्रोड, अनिश आहुजा, मनमोहन चोप्रा, गौरव कंत्रोड, पियुष कंत्रोड, सौरभ आहुजा, लव खंडुजा, कुश खंडुजा, तनिश कंत्रोड, अक्षय खुराणा, गुनित कंत्रोड, सागर कुमार आदींसह समाजबांधव व महिला उपस्थित होते.

दरम्यान, गुरुनानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त मागील सात दिवसांपासून शहरातील विविध गुरुद्वारांसह तारकपूर येथील भाई कुंदनलालजी गुरुद्वारा येथे विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अखंडपाठ, कीर्तन दरबार, प्रवचन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि लंगर यांचा समावेश होता. या सर्व कार्यक्रमांना भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदविला.

कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून गुरुनानक देवजी यांनी दिलेला मानवतेचा, समतेचा, बंधुभावाचा, सेवाभावाचा आणि एकतेचा संदेश समाजबांधवांपर्यंत पोहोचविण्यात आला. त्यांच्या विचारांचे स्मरण करीत समाजातील सर्व घटकांनी प्रेम, सद्भावना आणि परस्पर सहकार्याची भावना जपावी, असा संदेश या जयंती उत्सवातून देण्यात आला.



राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन कर्म भूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास २०२६ उत्साहात पार पडला.

आनंद तीर्थ समवशरण येथे सौरभ बोरा मित्र परिवाराचा सत्कार

सौरभ बोरा मित्र परिवार भोजन कमिटीचा सेवाभाव आणि समर्पण कौतुकास्पद : प्रविणऋषीजी महाराज

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन कर्म भूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास २०२६ उत्साहात पार पडला. या चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी सौरभ प्रमिलाताई हेमराज बोरा परिवाराने मंडप व भोजन व्यवस्थेची जबाबदारी घेतली होती. सौरभ बोरा मित्र परिवाराने चार महिने सेवाभावीपणे गौतम प्रसादी (भोजन व्यवस्था) सांभाळली. याबद्दल भोजन कमिटीचा समर्पण चातुर्मास कमिटीच्या वतीने सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यात झालेल्या या कार्यक्रमात आमदार संग्राम जगताप, पुणे येथील डॉ. कल्याण गंगवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत सौरभ बोरा मित्र परिवाराचे संतोष पिपाडा, किरण राका, सुधीर मुनोत, संजय ताथेड, नितीन चंगेडिया, महेश गुगळे, राहुल गांधी, अमरदीप बोरा, सचिन डुंगरवाल, अजित शिंगवी, अमित चंगेडिया, पंकज मुनोत, निखिल गुगळे, चिराग गुगळे, धीरज कोठारी, मनोज पितळे, सचिन डागा, धनेश गांधी, महेश गुगळे, भूषण बोरा, पवन गुंदेचा, तेजस डागा, नितीन गुगळे, राजू गांधी, सचिन मुनोत, आशिष पिपाडा, संजय सावज, ऋषभ गांधी, सचिन डागा आदींचा सत्कार करण्यात आला.

प्रविणऋषीजी महाराज म्हणाले, मंडळाचे सर्व सदस्य व त्यांच्या परिवारांनी चार महिने अतिशय सुंदर भोजन व्यवस्था पाहिली. सौरभ बोरा मुंबईत असतात पण येथील सर्व व्यवस्था त्यांच्या मित्र मंडळाने पाहिली. या लोकांनी असे काम केले की गौतम प्रसादीला सौरभ बोरा मित्र मंडळ प्रसादी असेही म्हणता येईल. इतकी उत्तम व्यवस्था त्यांनी केली. सलग चार महिने निरंतर ही जबाबदारी पार पाडताना सर्व सदस्यांच्या कुटुंबांनीही यात सहभाग घेतला. विशेष म्हणजे कोणीही कधीही कसलीही तक्रार केली नाही. खूप प्रेमाने त्यांनी सर्वांना प्रसादी दिली. विशेष म्हणजे यातील अनेकांनी उपवासही केले पण गौतम प्रसादीची सेवा नाही सोडली. समोर पंचपक्वान असूनही उपवास करणे ही साधनाच आहे. या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करून अभिनंदन करा.

सचिन डुंगरवाल म्हणाले, सौरभ बोरा यांनी जेव्हा भोजन व्यवस्थेची जबाबदारी घेतली तेव्हा आम्ही मित्र परिवाराने उत्साहाने प्रतिसाद दिला. जवळपास ३०० लोकांची टीम तयार झाली. हे काम करताना चार महिन्यात आम्हाला सहकार्य मिळाले. आम्हाला विविध संघांनीही सहकार्य केले. ही सर्व व्यवस्था टीम वर्क मुळे शक्य झाली. भविष्यातही अशी सेवा करण्याची संधी मिळाली तर नक्कीच आनंदाने स्विकारू.

राज्यस्तरीय कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी अहिल्यानगरच्या दत्तात्रय वारकड यांची निवड



नगर – अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, पुणे जिल्हा पूर्व विभागाच्या १० व्या राज्यस्तरीय कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी अहिल्यानगर जिल्ह्याचे कवी, लेखक व वक्ते दत्तात्रय वारकड यांची निवड झाली आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, पुणे जिल्हा पूर्व विभाग व एमआयटी विद्यापीठ, लोणी काळभोर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय कवी संमेलन २९ नोव्हेंबर रोजी एमआयटी विद्यापीठातील 'प्रयाग सभागृह' येथे होणार आहे.

संमेलनाध्यक्ष : दत्तात्रय वारकड, उद्घाटक : प्रा. डॉ. मंगेश कराड (कार्यकारी अध्यक्ष व कुलपती, एमआयटी विद्यापीठ, पुणे) प्रमुख अतिथी व मार्गदर्शक : डॉ.शरद गोरे (राष्ट्रीय अध्यक्ष, अ.भा.म.सा. परिषद) स्वागताध्यक्ष : डॉ.महेश चोपडे (कुलसचिव, एमआयटी विद्यापीठ, लोणी काळभोर), मुख्य संयोजक व निमंत्रक : प्रा.डॉ.सुरेश वाळेकर (अध्यक्ष, अ.भा.म.सा. परिषद, पुणे पूर्व विभाग)

दत्तात्रय वारकड यांचा परिचय:–संत साहित्याचे अभ्यासक म्हणून अहिल्यानगर जिल्ह्यात कार्यरत असलेले श्री. वारकड यांनी अल्पावधीतच युवकांमध्ये वैचारिक क्रांती घडवली आहे. कविता, लेखन आणि प्रेरणादायी व्याख्यानाच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रभर नावलौकिक कमावला आहे. आजपर्यंत त्यांनी १००० हून अधिक प्रेरणादायी व्याख्याने दिली आहेत. तणावमुक्त जीवन, आनंदी जीवनाचा आनंदोत्सव, व्यक्तिमत्व विकास, व्यसनमुक्ती, आजचा युवक व त्याच्यापुढील आव्हाने, मातृ–पितृ व गुरुजनांविषयी आदर, वाचन संस्कृती, मोबाईलचा अतिरिक्त वापर टाळणे या ज्वलंत विषयांवर ते शाळा, कॉलेज, तांत्रिक महाविद्यालये, पोलीस प्रशासन, जिल्हा परिषद, शासकीय कार्यालये, एमआयडीसी कंपन्या, आकाशवाणी अशा विविध ठिकाणी प्रबोधन करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्राचा लाडका कवी, आळंदी येथील संत ज्ञानेश्वर माऊली राज्यस्तरीय पुरस्कार, कोल्हापूर येथील ३१ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, महात्मा गांधी राज्यस्तरीय पुरस्कार, तसेच २०२७ चा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार (के. कला साधना समिती, लातूर) आणि शिर्डी येथील महाराष्ट्र साई कलाभूषण पुरस्कार २०२७ साठी निवड झाली आहे. ही माहिती कवी संमेलनाचे मुख्य संयोजक प्रा.डॉ.सुरेश वाळेकर यांनी दिली.

कर्मचारी सर्वंकष माहितीकोष अद्ययावत करण्याचे आवाहन

नगर – महाराष्ट्र शासनाच्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष २०२६ अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती विहित नमुन्यात अचूक व परिपूर्ण भरून निर्धारित वेळेत अद्ययावत करावी, असे आवाहन जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपआयुक्त दीपक दातीर यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती १ जुलै २०२६ रोजीच्या स्थितीनुसार माहितीकोषात नोंदविणे आवश्यक आहे. माहिती भरताना अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोबाईल क्रमांक, ई–मेल आयडी तसेच वैयक्तिक व सेवाविषयक तपशील अद्ययावत करणे आवश्यक आहे. माहितीकोषात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तपशिलासोबतच जुलै २०२६ च्या वेतन देयकानुसार मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती तसेच सेवापुस्तिकेनुसार आवश्यक तपशील नोंदविणे बंधनकारक आहे. भरलेली माहिती अचूक व परिपूर्ण असल्याची खात्री संबंधित कार्यालयप्रमुखांनी करावी.

सर्व शासकीय कार्यालयांनी माहितीकोष २०२६ मधील माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करून जिल्हा सांख्यिकी कार्यालयाकडून प्रथम प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य आहे. ज्या कार्यालयांनी सांख्यिकी कार्यालयाचे प्रमाणपत्र प्राप्त केले नसेल, त्यांची नोव्हेंबर २०२६ महिन्याची वेतन देयके डिसेंबर २०२६ मध्ये स्वीकारली जाणार नाहीत. त्यामुळे विलंब होऊ नये यासाठी सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी माहितीकोषाचे काम तातडीने पूर्ण करावे. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याने आपली माहिती अचूक भरली गेली असल्याची खात्री करावी.

ऐतिहासिक वारशांच्या संवर्धनाविषयी समाजात जागरूकता निर्माण होण्याची गरज

लेखिका, वास्तुविशारद काजल जंजिरे यांचे प्रतिपादन

नगर – इतिहास जतन करणे म्हणजे केवळ जुन्या वास्तूंचे संरक्षण करणे नव्हे, तर त्यांच्याशी संबंधित सत्य, स्मृती आणि सांस्कृतिक संदर्भ यांचेही जतन करणे होय. त्यासाठी ऐतिहासिक वारशांच्या संवर्धनाविषयी समाजात जागरूकता निर्माण होण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन लेखिका व वास्तुविशारद काजल महेश जंजिरे यांनी केले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याची साक्ष देणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पेडगाव (ता. श्रीगोंदा) येथील धर्मवीर गड या किल्ल्याबाबत सविस्तर माहिती असलेले पुस्तक पेडगावच्या रहिवासी असलेल्या लेखिका काजल महेश जंजिरे यांच्या लेखणीतून साकारले आहे. या माहितीपूर्ण पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आमदार विक्रमसिंह पाचपुते व आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते धर्मवीर गड किल्ला परिसरात पार पडला. त्यावेळी लेखिका जंजिरे बोलत होत्या.

काजल जंजिरे यांनी यावेळी पुस्तक निर्मिती प्रक्रियेचा पट उपस्थितांसमोर उलगडला. हे पुस्तक संभाजी महाराजांच्या शौर्याचे विविध पैलू व धर्मवीर गडाच्या ऐतिहासिक वारशाची माहिती नव्या पिढीसमोर बिंबविण्यासाठी एक सक्षम माध्यम व पर्याय आहे, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. केंद्रीय राखीव पोलिस दलात सहाय्यक कमांडंट या पदावर कार्यरत असलेले पती महेश ईश्वर जंजिरे यांचा पाठिंबा, प्रोत्साहन व योगदान तसेच सासू–सासरे व आई–वडिलांचा आशीर्वाद यामुळेच पुस्तक निर्मितीची प्रक्रिया पार पडली, असेही लेखिका जंजिरे यांनी सांगितले.



लेखिका व वास्तुविशारद काजल महेश जंजिरे लिखित धर्मवीर गड या पुस्तकाचे प्रकाशन करताना आमदार विक्रमसिंह पाचपुते व आमदार हेमंत ओगले. समवेत लेखिका काजल जंजिरे, सीआरपीएफचे सहायक कमांडंट महेश जंजिरे, ॲड. डी. डी. घोरपडे, कुंडलिक दरेकर, प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ, प्रा. डॉ. गणेश भगत, नेत्रदूत जालिंदर बोरुडे, कवी चंद्रकांत पालवे, ईश्वर जंजिरे, सुनील दरेकर आदी.

धर्मवीर गडाच्या संवर्धन व सुशोभीकरणासाठी निधी

आमदार पाचपुते यांनी काष्टी गावची लेक असलेल्या काजल या एक सिद्धहस्त लेखिका, चाणाक्ष आणि चतुर संशोधक आणि उत्कृष्ट वास्तुविशारद म्हणून अभिमान व गर्व असल्याचे सांगितले. धर्मवीर गडाच्या संवर्धन व सुशोभीकरणासाठी भरीव निधी आणण्यासाठी आपण पुढाकार घेतलेला आहे, असेही पाचपुते म्हणाले. ॲड. डी. डी. घोरपडे, इतिहासकार प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ, मसापचे विभागीय अध्यक्ष जयंत येलूलकर, कवी चंद्रकांत पालवे, नेत्रदूत जालिंदर बोरुडे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे, निवृत्त आयपीएस अधिकारी हेमंतराजे गायकवाड, पेडगावचे सरपंच इरफानभाई पिरजादे आदींची भाषणे झाली.

मंदिरे व ऐतिहासिक वारशाची पाहणी

गणराज प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या या पुस्तकाला पत्रकार डॉ. बाळासाहेब बोठे यांची प्रस्तावना आहे. गणराजचे संचालक प्रा. गणेश भगत, क्रिएटिव्ह कम्युनिकेशन्सचे संचालक जयंतराव देशपांडे आणि गणेश मुद्रणालयाचे संचालक गणेश दळवी यांचे या पुस्तकाच्या निर्मितीसाठी वेळोवेळी सहकार्य मिळाल्याचे लेखिका जंजिरे यांनी नमूद केले. डॉ. बाळासाहेब बोठे यांनी प्रास्ताविक केले. लेखिका जंजिरे यांचे सासरे ईश्वर जंजिरे, सासू सुनीता जंजिरे, वडील सुनील दरेकर, आई अश्विनी दरेकर, सुरेश जंजिरे व महेश दरेकर यांनी स्वागत केले. विशाल चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. गणेश भगत यांनी आभार मानले कार्यक्रमानंतर उपस्थितांनी धर्मवीर गडाच्या सुमारे ९० एकर क्षेत्रातील वास्तू, मंदिरे व ऐतिहासिक वारशाची पाहणी करून माहिती घेण्याची संधी साधली.

धम्माल मनोरंजन

सुविचार



मणभर चर्चेपेक्षा कणभर आचरण श्रेष्ठ असते.

दिनविशेष २७ नोव्हेंबर

१७०१: अँडर्स सेल्सियस स्वीडिश खगोलशास्त्र व संशोधक यांचा जन्म.१८७१: जियोव्हानी जॉर्जी इटालियन भौतिकशास्त्रज्ञ यांचा जन्म.१८५७: सर चार्ल्स शेरिंग्टनफ नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश जैवरसायनशात्रज्ञ यांचा जन्म. (मृत्यू: ४ मार्च १९५२)१८७०: दत्तात्रय बळवंत पारसनीस इतिहास संशोधक यांचा जन्म.१८७४: चेम वाइझमॅन इस्त्राएलचे पहिले राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू: ९ नोव्हेंबर १९५२)१८७८: जतिंद्रमोहन बागची भारतीय कवि आणि समीक्षक यांचा जन्म. (मृत्यू: १ फेब्रुवारी १९४८)१८८१: डॉ. काशीप्रसाद जायस्वालफ प्राच्यविद्या पंडित व कायदेतज्ञ यांचा जन्म. (मृत्यू: ४ ऑगस्ट १९३७)१८८८: गणेश वासुदेव मावळंकर भारतीय लोकसभेचे पहिले सभापती यांचा जन्म.१८९४: कोनसुके मात्सुशिता पॅनासोनिक चे संस्थापक यांचा जन्म. (मृत्यू: २७ एप्रिल १९८९)१९०३: लार्स ऑन्सेगर नोबेल पारितोषिक विजेते नॉर्वेचे रसायनशास्त्रज्ञ यांचा जन्म.१९०७: हरीवंशराय बच्चनफ -विख्यात हिंदी साहित्यिक यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी २००३)१९०९: नातोली माल्त्सेव रशियन गणितज्ञ यांचा जन्म.१९१५: दिगंबर बाळकृष्ण मोकाशी मराठी कथा कादंबरीकार यांचा उरण, रायगड येथे जन्म. (मृत्यू: २९ जून १९८१)१९४०: ब्रूस लीफ अमेरिकन अभिनेता आणि मार्शल आर्ट तज्ञ यांचा जन्म. (मृत्यू: २० जुलै १९७३)१९४२: मृदुला सिन्हा भारतीय लेखक आणि राजकारणी यांचा जन्म.१९४७: कार्तिकेय साराभाईफ भारतीय पर्यावरणवादी यांचा जन्म.१९५२: बॅप्पी लाहिरी भारतीय गायक-गीतकार आणि निर्माते यांचा जन्म.१९७७: भूषण कुमार - म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुपर कॅसेट इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांचा जन्म.१९८०: आतिश तासीर भारतीय पत्रकार यांचा जन्म.१९८६: सुरेश रैना भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्मवरीलप्रमाणे २७ नोव्हेंबर ि मृत्यू :१७५४: अब्राहम डी. मुआव्हर फ्रेन्च गणितज्ञ यांचे निधन. (जन्म: २६ मे १६६७)१९५२: अहिताग्नी राजवाडे तत्वचिंतक यांचे निधन. (जन्म: २३ ऑक्टोबर १८७९)१९६७: लेओन मब्बा गॅबॉन देशाचे पहिले अध्यक्ष यांचे निधन. (जन्म: ९ फेब्रुवारी १९०२)१९७५: रॉस मॅक्काहिरटर गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्स चे सहसंस्थापक यांचे निधन. (जन्म: १२ ऑगस्ट १९२५)१९७६: गजानन त्र्यंबक माडखोलकर प्रसिद्ध मराठी पत्रकार, समीक्षक, कादंबरीकार यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १८९९)१९७८: लक्ष्मीबाई केळकर भारतीय समाजसेविका, राष्ट्रसेविका समितीच्या संस्थापक यांचे निधन. (जन्म: ६ जुलै १९०५)१९९४: दिगंबर विनायक पुरोहित स्वातंत्र्यसेनानी, रायगड मिलिटरी स्कूल चे संस्थापक यांचे निधन. (जन्म: २८ मे १९०७)१९९५: संजय जोग दूरदर्शन व चित्रपट कलावंत यांचे निधन. २०००: बाळकृष्ण दत्तात्रेय सातोस्कर साहित्यिक, संशोधक, दैनिक गोमंतकचे पहिले संपादक यांचे निधन. (जन्म: २६ मार्च १९०९)

२००२: शिवमंगल सिंग सुमन भारतीय कवी यांचे निधन.

महाशब्दकोडे



आडवे संकेत

१) कठोर हृदयाचा
५) एका फळाचे नाव
७) अल्प शिरकाव
१०) डोलीसारखे एक यान
११) शेपटी
१३) श्रुती, धर्म, ज्ञान
१४) बी नसलेला कापूस
१५) वर्जणे, टाकणे
१६) दसऱ्याच्या दिवशी या वनस्पतीची पूजा करतात
१७) एक प्रकारची भाजी
१८) सध्याचे, तात्पुरते
१९) शंभर पैसे
२०) चाकर
२१) देवपुजेतले अभिषेकानंतर देवावर शंखातून ओतलेले पाणी
२४) डोळ्यांचे दान
२६) प्रकाशमय वातावरण, झगमगाट
२८) एक सुगंधी वनस्पती
२९) माळी
३२) पळणे
३४) एका ऋतूचे नाव
३६) कोरे पुस्तक
३८) अशक्त, रोड
३९) गोंडस, देखणा
४०) आय काँग्रेसचे बोधचिन्ह
४२) एक पक्षी
४३) भारतालगतचा एक देश
४४) धरती, पृथ्वी
४७) जोराचा श्वास
४९) अवधी, उशीर
५०) चिरेबंदी
५१) ढग, मेघ

उभे संकेत

२) ज्याचे वळण दक्षिणाकृती असून शरीरावर भोवरे आहेत असा शंख
३) माया
४) एक रत्न
५) पाकीस्तानचा एक क्रिकेटपटू
६) सिद्धी
७) चलाख, हुशार
८) प्रवेश करण्याचे पत्र
९) जाणूनबुजून
१२) महाराष्ट्रातील एक जिल्हा
१७) शेकाटा, वाफारा
१९) ने रु चा अक्षरबदल
२२) दुष्टांचा मुख्य
२३) तीक्ष्ण, तिखट
२५) लोणी
२६) पोपटाला म्हणायला शिकवितात असा शब्द
२७) एक प्रसिद्ध समाजसुधारक
३०) नुतन
३१) नेम लावून टिपलेला प्राणी
३३) वंदनाचा शब्द
३५) फिरण्यास मज्जाव
३७) आंसडा, झटका
३९) राजाचे राहण्याचे ठिकाण
४१) यज्ञोपवीत
४५) स्वच्छ
४६) सुगंध, परिमल
४८) पंख, परंतु

मागील उत्तर

आ	ग	बो	ट		शि	बा	का		अ		अ	सा
	ज	ग		पा	व	सा	ळी	अ	धि	वे	श	न
यु		दा	भ	ण			ज	न	क		क्त	
ग			र	द		भा				ऊ		म
पु	त्र	व	ती		ला	लु	च		स	मा	धा	न
रु		टि		कं	प		र	ब	र			मो
ष	ट	का	र		नि	का	स		स		मो	ह
	म		शि	बा	का				ग	म		न
प	ट	वे	क	रे		धों		अ	ट	क		दे
को	म	ल		क	बा	ड	क	ष्ट		डी		सा
डा		बु		सा	रा		च	प	ला		बा	ई
	क	टी	व	रे	हा	त		दी	प	मा	ला	
ख	डू			क	त	वा	र		शी		जी	व



१) नांदेड जिल्ह्यातील किनवट, कंधार व मुखेड या तालुक्यामध्ये खालीलपैकी कोणत्या भटक्या जातीची वस्ती आहे?
अ)गोंड ब)कोरकू क)लमान ड)काठेवाडी

२) राज्यात फक्त अमरावती जिल्ह्यात खालीलपैकी कोणत्या परिसरात कॉफीचे मळे आढळतात?
अ)अकोट ब)धामणगाव क)सीमाडोह ड)चिखलदरा

३) कोणता जिल्हा महाराष्ट्र शासनाने उद्योग विरहीत जिल्हा म्हणून जाहीर केला आहे?
अ)चंद्रपूर ब)नागपूर क)गडचिरोली ड)भंडारा

४) सिमेंटचे खांब तयार करण्याच्या उद्योगासाठी खालीलपैकी कोणते गांव प्रसिद्ध आहे?
अ)गंगाखेड (परभणी) ब)गंगापूर (औरंगाबाद)
क) शहादा (नंदूरबार) ड) खामगाव (बुलढाणा)

५) महाराष्ट्र व गुजरात या राज्यांच्या सीमेवरील नाशिक जिल्ह्यातील खालीलपैकी कोणते स्थळ निसर्गरम्य म्हणून ओळखले जाते?
अ)तोरणमाळ ब)सापुतारा क)कादवा ड)कुकडी

६) उत्तर सोलापूर मधील कोठे माळढोक पक्षी अभयरण्य आहे? अ)नांन्नज ब)तासगाव क)बहे- बोरगाव ड)खानापूर

७) महाराष्ट्रातील अति उत्तरेकडील शहर खालीलपैकी कोणते?
अ)धुळे ब)मालेगाव क)नंदुरबार ड)जळगाव

८) महाराष्ट्रातील केळीचे आगर म्हणून कोणते शहर ओळखले जाते?
अ)नाशिक ब)धुळे क)नंदुरबार ड)जळगाव

९) बीड शहर कोणत्या नदीकाठी वसलेले आहे?
अ)बिंदुसरा ब)गोदावरी क)वैनगंगा ड)वर्धा

१०) खालीलपैकी कोणते शहर पितळी भांडी बनविण्याच्या परिसरात व्यवसायासाठी प्रसिद्ध आहे?
अ)गोंदिया ब)अमरावती क)देऊळघाट ड)भंडारा

११) ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी भारत सरकारने राष्ट्रीय पातळीवर सुरु केलेला पहिला महत्त्वाचा कार्यक्रम खालीलपैकी कोणता?
अ)समुदाय विकास ब) सामाजिक विकास
क)श्रमप्रधान ड) ग्राम सुधार कार्यक्रम

१२) महाराष्ट्रात आदिवासी क्षेत्रात एकाधिकार खरेदी योजना केव्हापासून सुरु करण्यात आली?
अ) १९७२ ब)१९७६ क)१९७८ ड)१९८०

१३) संजय गांधी निराधार अनुदान योजना ६५ वर्षाहून अधिक वयाचे वृद्ध व निराधार पुरुष आणि कितीहून अधिक वयाच्या निराधार स्त्रीयांना लागू आहे?
अ)६० वर्ष ब)७० वर्ष क)८२ वर्ष ड)८० वर्ष

१४) मुळचा २० कलमी कार्यक्रम तत्त्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी कधी जाहीर केला होता?
अ)२० जानेवारी १९७४ ब)२० जुन १९७५
क)२० एप्रिल १९७२ ड)२० नोव्हेंबर १९७३

१५) पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कारकिर्दीत कोणत्या वर्षी २० कलमी कार्यक्रमाची पुनर्रचना केली गेली?
अ)सन १९०७ ब)सन २००८
क)सन २००९ ड)सन २००६

१६) सुशिक्षीत बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार पुरविणारी कोणती योजना देशात व राज्यात १९९४-९५ पासून प्रचलीत आहे?
अ)पंतप्रधान रोजगार योजना
ब)रोजगार हमी योजना
क)ग्रामसुधार योजना ड) रोजगार भत्ता योजना

१७) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम हा केंद्र शासनाने पुरस्कृत केलेला कार्यक्रम राज्यामधे कधी सुरु करण्यात आला ?
अ)१९७४ ब)१९७६ क)१९७८ ड)१९८०

१८) खालीलपैकी कोणत्या वर्षी मुलकीपाटीलपद रद्द झाले? अ)१९६४ ब)१९६३ क)१९६५ ड)१९६८

उत्तर: (१-क), (२-ड), (३-क), (४-अ), (५-ब), (६-अ), (७-अ), (८-ड), (९-अ), (१०-ड), (११-अ), (१२-ब), (१३-अ), (१४-ब), (१५-ड), (१६-अ), (१७-क),(१८-ब)



आडवे संकेत

१) सन् २००१ में मेघना गुलजार निर्देशित इस फिल्म में संजय सुरी, तब्बु और सुस्मिता सेन थे.
३) सन् १९९४ में सुरज बडजात्या निर्देशित इस फिल्म में मोहनिश बहल, रेणुका शहाने, सलमान खान और माधूरी दीक्षीत थे.
७) जमाना (फिल्म)
८) इस फिल्म में राज बब्बर और स्मिता पाटील थे.
९) सन् १९८९ में कल्पतरु निर्देशित इस फिल्म में ऋषी कपूर, जयाप्रदा और माधवी थे.
१२) सन् १९९१ में यश चोपडा ने बनाई इस फिल्म में अनिल कपूर और श्रीदेवी थे.
१३) सन् १९९७ में मेहुल कुमार निर्देशित इस फिल्म में अक्षय कुमार, फरहा और करिश्मा कपूर थे.
१४) बहोत प्यार करते है तुमको सनम कसम चाहे ले लो... यह गीत इस फिल्म का है.
१५) सन् १९९६ में सुनील शर्मा निर्देशित इस फिल्म में सनी देओल, शिल्पा शेट्टी और तब्बु थे.
१६) सन् १९९७ में डेविड धवन निर्देशित इस फिल्म में गोविंदा और करिश्मा कपूर थे.
१९) सौदागर इस फिल्म की एक अभिनेत्री.
२०) बेदर्द क्या जाने (फिल्म)
२१) सन् १९९० में रमनेश पुरी निर्देशित इस फिल्म में संजय दत्त और किमी काटकर थे.
२६) सन् १९७१ में कमर नारवी निर्देशित इस फिल्म में राजेश खन्ना और शर्मिला टैगोर थे.
२८) सन् २००० में महेश मांजरेकर निर्देशित इस फिल्म में संजय दत्त और माहिमा चौधरी थे.
२९) ईश्क में मेरे रब्बा जाने मै क्या कर जाती.... यह गाना इस फिल्म का है.
३०) आप हमारे होते (फिल्म)

उभे संकेत

१) सन् २००० में अजीज मिर्जा निर्देशित इस फिल्म में शाहरुख खान और जुही चावला थे.
२) सन् १९८९ में बी. सुभाष ने बनाई इस फिल्म में अमिर खान और जुही चावला थे.
३) सन् १९९३ में अशोक गायकवाड निर्देशित इस फिल्म में जैकी श्रॉफ और नगमा थे.
४) पागल दिवाना (फिल्म)
५) हो तुम जो दिल में समाये जाते हो..... (गीत)
६) संजीवकुमार की एक फिल्म.

फिल्मी शब्दकोडे

१०) सन् १९९४ में उमेश मेहरा निर्देशित इस फिल्म में मिथून चक्रवर्ती, श्वेता और सैफ अली खान थे. ११) कामचोर इस फिल्म का अभिनेता. १४) सन् २००३ में बनी दिल परदेसी हो गया इस फिल्म के निर्देशक. १७) सन् १९७८ में आर. झालानी निर्देशित इस फिल्म में विनोद खन्ना, ऋषी कपूर, जितेंद्र और रीना रॉय थे.
१८) सन् १९९६ में प्रकाश झा निर्देशित इस फिल्म में जैकी श्रॉफ और जुही चावला थे.
२२) सन् १९९१ में हैरी बावेजा निर्देशित इस फिल्म में धर्मेंद्र, मिथून चक्रवर्ती और शिल्पा शिरोडकर थे.
२३) सन् १९६६ में ऋषीकेश मुखर्जी निर्देशित इस फिल्म में सुनील दत्त और साधना थे.
२४) सन् १९७० में असित सेन निर्देशित इस फिल्म में राजेश खन्ना और शर्मिला टैगोर थे.
२५) इतनी शक्ती हमे दे ना दाता मन का विश्वास..... यह गाना इस फिल्म का है.
२७) विवेक ओबेरॉय और अंतरामाली अभिनीत फिल्म.

मागील फिल्मी उत्तर

उ	स्ता	दो	के	उ	स्ता	द		सा	हि	बा		ला
त्री		स्ता		ल्टा		रा		त		द		ड
स	प	ना		सि	म	र	न		ज	ल	ज	ला
बि			सु	धा			ज		वा		ब	
स	ल	मा	न		मे	ह	र	बा	नी		प्या	
	व		स		रा		के		दि	दा	र	
ब	ल	रा	ज	सा	ह	नी		दा	वा		कि	म
	व		ना	य	क		लै		नी		सी	
दि	ल	से		रा		ई	ला	का		ब	से	रा
ल	व		जां	बा	ज			ती			हो	
क्या		सु		नो			दि	ल	है	बे	ता	ब
क	या	म	त		रं				रा		है	
रे		न		सं	ग	दि	ल	स	न	म		

विनोद

'ऐकलं का?' सुधाताई आपल्या मिस्टरांना म्हणाल्या.
'काय?' वामनरावांनी विचारलं.
'उद्या म्हटलं, आपल्या लग्नाचा पंचविसावा वाढदिवस आहे.'
सुधाताई म्हणाल्या.
'विसरला तर नाही ना?'
'छे! छे! कसा विसरेन मी तो दिवस? वामनराव म्हणाले, 'बरं, मग तू काय करायचं ठरवलं आहेस उद्या?'
'उद्या की नाही, दोन कोंबड्या कापायचा माझा विचार आहे,' सुधाताई लाडिकपणे म्हणाल्या. त्या बिचाऱ्यांचा काय दोष वामनराव काहीसे त्रासिकपणे म्हणाले, पंचवीस वर्षांपूर्वी जी दुर्घटना घडली त्याबद्दल त्यांना कशाला जबाबदार धरतेस!?'

क्लेरा ब्रूस हायस्कूल फॉर गर्ल्स व अहमदनगर बोर्डिंग हायस्कूल शाळा बंद करण्यास स्थगिती द्यावी

हेरिटेज बेस्ड मॉडेल स्कूल करण्याची मिस् सिंथिया फॅरार शाळा बचाव अभियानची मागणी

नगर – क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अध्यापनाच्या प्रशिक्षणाशी व प्रेरणेशी संबंधित मिस् सिंथिया फॅरार यांच्या ऐतिहासिक शैक्षणिक कार्याचा वारसा असलेल्या क्लेरा ब्रूस हायस्कूल फॉर गर्ल्स आणि अहमदनगर बोर्डिंग हायस्कूल या दोन शाळा बंद करण्याच्या प्रक्रियेला स्थगिती देऊन त्यांचे पुनरुज्जीवन करावे, अशी मागणी मिस् सिंथिया फॅरार शाळा बचाव अभियानच्या वतीने करण्यात आली. महात्मा जोतिराव फुले यांच्या जन्माचे द्विशताब्दी वर्ष साजरे करत असताना या शाळांचे मॉडेल स्कूलङ्कमध्ये रूपांतर करावे, अशी मागणीही करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड तसेच मराठी मिशनच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



क्लेरा ब्रूस हायस्कूल फॉर गर्ल्स आणि अहमदनगर बोर्डिंग हायस्कूल या दोन शाळा बंद करण्याच्या प्रक्रियेला स्थगिती देऊन त्यांचे पुनरुज्जीवन करावे, अशी मागणी मिस् सिंथिया फॅरार शाळा बचाव अभियानच्या वतीने करण्यात आली.

यावेळी रेव्ह. जी.आर. वाघमारे, माजी विद्यार्थीनी संध्या मेढे, निवृत्त समाजकल्याण अधिकारी रफिक मुन्शी, इतिहासप्रेमी मंडळाचे भैरवनाथ वाकळे, अभिजीत एकनाथ वाघ, आसिफखान दूलेखान, बॉईज हायस्कूलचे माजी विद्यार्थी जफर खान, अजय सूर्यवंशी, डी. डी. सोनवणे, राजू देठे, सुनील बनसोडे, फिरोज शेख, विशाल केदारे, दीपाली कांबळे, स्मिता नाईक, विजय काकडे, अर्पा साळवे, सीमा जाधव, राणी पातारे, किरण कटारिया, पंकज गुंदेचा, डॉ. महेश पाटोळे, विजय कर्डक, सॅम नाईक, अनिल नेटके, राहुल वैराळ, एज्रा फाउंडेशनचे सेवक यांसह माजी विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

अहमदनगर बोर्डिंग हायस्कूलची स्थापना

अमेरिकन मराठी मिशनने १८२८ मध्ये महाराष्ट्रात शैक्षणिक कार्य सुरू केले. १८३८ मध्ये मुलींसाठी शाळेची स्थापना करण्यात आली. तत्कालीन अहमदनगरमध्ये मिस् सिंथिया फॅरार यांनी शिक्षणप्रसारासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. पुढे १८८२ मध्ये अहमदनगर बोर्डिंग हायस्कूलची स्थापना झाली. या दोन्ही संस्था महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षण आणि आधुनिक शिक्षणाच्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे आहेत. अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाने मिस् सिंथिया फॅरार यांच्या कबरीचा शोध घेतल्याने या ऐतिहासिक वारशाच्या जतनाचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला.

दोन्ही शाळांमधील शिक्षकांची कमतरता

दोन्ही शाळांमधील शिक्षकांची कमतरता, शिक्षक समायोजन, वेतनाचे प्रश्न, विद्यार्थिसंख्या घटणे आणि शैक्षणिक सुविधांचा अभाव यामुळे शाळांची अवस्था खालावल्याचा आरोप अभियानाने केला. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक कागदपत्रांची पडताळणी, प्रलंबित वेतन व भत्ते निकाली काढणे आणि आवश्यक शिक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. शाळा बंद करण्याच्या प्रक्रियेला स्थगिती देऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, शिक्षकांचे प्रश्न आणि पुनरुज्जीवनाची शक्यता विचारात घ्यावी. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, वंचित, आदिवासी व ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षण, निवास, पोषण, डिजिटल शिक्षण आणि कौशल्यविकासाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निवेदनात म्हटले आहे.

जनआंदोलन उभारण्याचा इशारा

या ऐतिहासिक शाळांचे हेरिटेज बेस्ड मॉडेल स्कूलमध्ये रूपांतर करून इमारतींचे जतन, ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडा सुविधा आणि आधुनिक शिक्षण व्यवस्था विकसित करावी. तसेच मिस् सिंथिया फॅरार, सावित्रीबाई फुले व स्त्रीशिक्षणाच्या इतिहासाचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी ऐतिहासिक माहिती केंद्र किंवा संग्रहालय उभारावे. यासाठी माजी विद्यार्थी, सामाजिक संस्था आणि सीएसआर निधीचा सहभाग घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. शाळांचे पुनरुज्जीवन न झाल्यास व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशाराही अभियानाच्या वतीने देण्यात आला.



कार्तिक पौर्णिमेच्या पवित्र पर्वानिमित्त अहिल्यानगर येथील लाड सुवर्णकार समाजाच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दीपोत्सव भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्तिक पौर्णिमेनिमित्त 'लाड सुवर्णकार'च्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दीपोत्सव उत्साहात

महिलांच्या सहभागातून मंदिर परिसर उजळला; वर्षभर विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

नगर – कार्तिक पौर्णिमेच्या पवित्र पर्वानिमित्त अहिल्यानगर येथील लाड सुवर्णकार समाजाच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दीपोत्सव भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिरात दीपप्रज्वलन करून विठ्ठल-रुक्मिणी चरणी श्रद्धा व्यक्त करण्यात आली. दिव्यांच्या प्रकाशाने मंदिर परिसर उजळून निघाला, तर धार्मिक वातावरणात भक्ती, आनंद आणि उत्साहाची अनुभूती उपस्थितांना मिळाली. समाजातील धार्मिक परंपरा जतन करण्याबरोबरच एकत्रितपणे सण साजरे करण्याच्या उद्देशाने हा दीपोत्सव आयोजित करण्यात आला.

लाड सुवर्णकार समाजाच्या वतीने धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना दरवर्षी विशेष महत्त्व दिले जाते. कार्तिक पौर्णिमा, दीपोत्सव तसेच विविध धार्मिक सणांच्या निमित्ताने मंदिरात उपक्रम राबविण्यात येतात. यासोबतच वर्षभर सामाजिक बांधिलकी जपत विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन केले जाते. समाजातील एकोपा वाढविणे, महिलांचा सहभाग प्रोत्साहित करणे, धार्मिक संस्कार जपणे आणि सामाजिक कार्यातून गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे, हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. यामुळे धार्मिक कार्यक्रमांबरोबरच सामाजिक कार्याची परंपराही समाजात रुजत आहे.

या दीपोत्सवात सुजाता कुलट, छाया लकारा, मंगल डागवाले, संगीता बेरड, गौरी लोंढे, वनिता शहरकर, वंदना शहरकर, विजया काळे आणि कीर्ती तांबेकर यांनी सहभाग घेतला. महिलांनी एकत्र येत दीपप्रज्वलन आणि उत्सवाच्या आयोजनात योगदान दिले. अशा उपक्रमांमुळे समाजातील महिलांना एकत्र येण्याची संधी मिळते, आपुलकीचे नाते दृढ होते आणि पुढील पिढीला धार्मिक व सांस्कृतिक परंपरांची ओळख करून देता येते. कार्तिक पौर्णिमेनिमित्त आयोजित दीपोत्सवाने श्रद्धा, सामाजिक एकता आणि सेवाभाव यांचा सुंदर संगम घडवून आणला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लाड सुवर्णकार समाजाचे विश्वस्त मंडळ आणि समाजबांधव बंधू भगिनी यांचे सहकार्य लाभले.

'राज्य फुटबॉल संघा'च्या निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिरासाठी अहिल्यानगर येथील प्रांजल काकडे व सिद्धी पोटे यांची निवड

नगर – अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन, अहिल्यानगरच्या कनिष्ठ मुलींच्या फुटबॉल संघातील प्रांजल अर्जुन काकडे आणि सिद्धी शिवाजी पोटे या दोन खेळाडूंची महाराष्ट्र राज्य कनिष्ठ मुलींच्या फुटबॉल संघाच्या निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे. हे निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिर २५ नोव्हेंबर पासून मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे.



या शिबिरातून निवडण्यात येणारा महाराष्ट्राचा संघ आगामी राष्ट्रीय कनिष्ठ मुलींच्या फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करणार असून ही राष्ट्रीय स्पर्धा १२ ते १७ डिसेंबर दरम्यान गुवाहाटी, आसाम येथे पार पडणार आहे.

प्रांजल काकडे आणि सिद्धी पोटे यांनी जळगाव येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य कनिष्ठ मुलींच्या आंतरजिल्हा फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले होते. या स्पर्धेत दोन्ही खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत जिल्हा संघाला उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचविण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. उपांत्यपूर्व फेरीत अहिल्यानगर संघाला अत्यंत अटीतटीच्या सामन्यात निसटत्या फरकाने पराभव स्वीकारावा लागला. मात्र, खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, कौशल्य आणि सांघिक भावना निश्चितच कौतुकास्पद ठरली.

ADFA अहिल्यानगरसाठी ही निवड विशेष अभिमानाची बाब आहे. यापूर्वी ADFA वरिष्ठ महिला संघातील सुमय्या शेख आणि राणी कदम यांनी सलग दोन हंगाम महाराष्ट्र राज्य वरिष्ठ महिला फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या संघाचे प्रतिनिधित्व केले होते. त्यानंतर त्यांना महाराष्ट्राच्या वरिष्ठ महिला राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली.

या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, अमरजीतसिंह शाही, मानद सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव व व्हिक्टर जोसेफ, राजू पाटोळे, खजिनदार रिशपाल सिंह परमार, सहखजिनदार रणबीर सिंह परमार, तसेच कार्यकारिणी, जिल्हा संघ प्रशिक्षक प्रसाद पाटोळे, संघ व्यवस्थापक आश्विनी पाटोळे आणि असोसिएशनच्या सदस्यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले आहे. या यशामध्ये जळगाव येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेपूर्वी गुलमोहर फुटबॉल क्लबने अहिल्यानगर जिल्हा कनिष्ठ मुलींच्या संघाला सरावासाठी मैदान उपलब्ध करून देण्यासह प्रशिक्षण व तयारीसाठी सहकार्य केल्याबद्दल गुलमोहर फुटबॉल क्लबचे आभार मानले. तसेच ADFA कार्यकारिणी सदस्य पल्लवी सैंदाणे आणि ADFA कार्यकारिणी सदस्य तसेच गुलमोहर फुटबॉल क्लबचे जोहेब खान यांच्या सहकार्याचे व योगदानाचे असोसिएशनतर्फे कौतुक करण्यात आले.

अहिल्यानगर शहरात एक दिवस उशिराने होणार पाणीपुरवठा

शटडाऊन आणि दुरुस्तीच्या कामामुळे निर्णय

नगर – महावितरणच्या शटडाऊन आणि दुरुस्तीच्या कामामुळे शहरातील पाणीपुरवठा वेळापत्रक एक दिवस पुढे ढकलण्यात आले आहे. महावितरणकडून २७ नोव्हेंबर रोजी शटडाऊन असल्याने शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागात एक दिवस उशिरा पाणीपुरवठा होणार आहे. मुळा धरण विद्युत वाहिनीच्या दुरुस्तीसाठी २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत शटडाऊन असणार आहे. याच वेळेत महापालिकेच्या शहर पाणीपुरवठा योजनेवरील दुरुस्ती कामे केली जाणार आहेत. या दरम्याच्या काळात मुळानगर येथुन होणारा पाण्याचा उपसा बंद राहणार आहे. शहरातील नागरिकांनी उपलब्ध पिण्याचे पाणी काटकसरीने वापरावे असे आवाहन महापौर ज्योती गाडे व महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

सकाळी ११ नंतर पाणी वाटप होणाऱ्या बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सूर्यनगर, निर्मलनगर, मुकुंदनगर तसेच स्टेशन रोड, आगरकर मळा, केडगाव, नगर-कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर या भागात २७ नोव्हेंबरला पुरवठा होणार नाही. या भागांना २८ नोव्हेंबरला पाणीपुरवठा होणार आहे.

रोटेशननुसार पाणीपुरवठा होणाऱ्या मध्यवर्ती शहरातील मंगलगेट, रामचंद्र खुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी तसेच गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हिल हडको, प्रेमदान हडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हडको, सारसनगर, बुरूडगाव रोड, बालिकाश्रम रोड आदी भागातील पाणीपुरवठा २८ नोव्हेंबर रोजी रद्द करण्यात आला आहे. या भागाला २९ नोव्हेंबर रोजी पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

रोटेशननुसार सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफ खाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, कापड बाजार, खिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने महानगरपालिका कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर व सावेडी आदी भागांत २९ नोव्हेंबर रोजी पाणीपुरवठा होणार नसून तेथे ३० नोव्हेबर रोजी पाणीपुरवठा होईल.



छत्रपती संभाजीनगर रोडवरील तपोवननगर मधील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा, कळस पुजा नागरिकांच्या हस्ते विधिवत पूजा करून झाला. याप्रसंगी हभप महाराज मंडळी, परिसरातील महिला, नागरिक उपस्थित होते. (छायाचित्र : विजय मते)

जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक चाँद शेख यांना 'शिक्षण रत्न पुरस्कार'

नगर – परतगंगा व जिद्द फाऊंडेशनच्या वतीने नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना 'शिक्षण रत्न पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, शाळांच्या भौतिक सुविधा विकसित करण्यासाठी लोकसहभागातून प्रयत्न करणे आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदविणे, अशा विविधांगी कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



चाँद हुसेन शेख यांनी शिक्षक म्हणून आपल्या सेवाकाळात अनेक विद्यार्थ्यांना घडवून त्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देण्याचे कार्य केले आहे. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, गुणवत्ता, सामाजिक जाणीव आणि संस्कार रुजविण्यावर त्यांचा विशेष भर राहिला आहे.

शेख यांनी ज्या-ज्या ठिकाणी शिक्षक म्हणून सेवा बजावली, त्या-त्या ठिकाणी शाळांच्या विकासासाठी पुढाकार घेतला. ग्रामस्थांना सोबत घेऊन लोकसहभागातून शाळांच्या इमारती उभारण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. किन्ही (पारनेर), दरेवाडी (नगर), हिवरेझरे (नगर), कनोली (संगमनेर), नाचनगाव (अकोले) आणि नवनागापूर (नगर) येथील शाळांच्या इमारतींची कामे यशस्वीरीत्या मार्गी लावण्यात त्यांनी योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने त्यांनी केलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरले आहेत.

शैक्षणिक कार्याबरोबरच चाँद शेख यांनी सामाजिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदविला आहे. समाजातील विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम त्यांनी केले आहे. विशेष म्हणजे ते उत्कृष्ट पोवाडा गायक असून महाराष्ट्राच्या शौर्यशाली इतिहासाची आणि सांस्कृतिक परंपरेची ओळख आपल्या गायनातून करून देतात. पोवाड्याच्या माध्यमातून ऐतिहासिक महापुरुषांचे विचार आणि पराक्रम नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्यही ते करतात.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

माजी सैनिकांना राजकीय आरक्षण द्या; जय हिंद फाउंडेशनचा ४१ मंत्र्यांना साकडे!

हिवाळी अधिवेशनात अध्यादेश काढण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिफारस करण्याचे आवाहन

नगर – देशाच्या संरक्षणासाठी आयुष्याची महत्त्वाची वर्षे समर्पित करणाऱ्या माजी सैनिकांना आता राजकीय क्षेत्रातही सन्मानपूर्वक प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी जय हिंद फाउंडेशन अहिल्यानगरने पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायतीपासून ते महानगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि राज्यपाल नियुक्त आमदारांपर्यंत प्रत्येक स्तरावर माजी सैनिकांसाठी प्रत्येकी एक स्वीकृत सदस्यपद राखीव ठेवण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र शासनातील सर्व ४१ मंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले असून, त्यांनी या मागणीची मुख्यमंत्री महोदयांकडे शिफारस करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

जय हिंद फाउंडेशन अहिल्यानगर तसेच महाराष्ट्रातील आजी-माजी सैनिक परिवार आणि शहीद परिवार यांच्या वतीने राज्य सरकारच्या ४१ मंत्री महोदयांना निवेदन देण्यात आले आहे. यामध्ये माजी सैनिकांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून प्रतिनिधित्व देण्यासाठी राज्य सरकारने हिवाळी अधिवेशनात अध्यादेश काढावा किंवा शासन निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सर्व मंत्र्यांनी या मागणीला सकारात्मक पाठिंबा देऊन मुख्यमंत्री यांच्याकडे शिफारस करावी, अशी भूमिका फाउंडेशनने मांडली आहे.

फाउंडेशनने केलेल्या मागणीनुसार महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये एक स्वीकृत सदस्य माजी सैनिकांसाठी नियुक्त करण्यात यावा. त्याचप्रमाणे नगरपरिषदा आणि नगरपालिकां मध्ये प्रत्येकी एक स्वीकृत नगरसेवक, महानगरपालिकांमध्ये एक स्वीकृत सदस्य, पंचायत समित्यांमध्ये एक स्वीकृत पंचायत समिती सदस्य आणि जिल्हा परिषदांमध्ये एक स्वीकृत जिल्हा परिषद सदस्य म्हणून माजी सैनिकांना संधी देण्यात यावी.



शिवाजी पालवे

याशिवाय राज्यपाल नियुक्त आमदारां मध्येही एका माजी सैनिकाची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अशा प्रकारे गावपातळीपासून राज्याच्या विधिमंडळापर्यंत माजी सैनिकांना लोकप्रतिनिधित्वाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने स्वतंत्र धोरण निश्चित करावे, अशी फाउंडेशनची भूमिका आहे.

माजी सैनिक देशसेवेतून निवृत्त झाल्यानंतरही समाजासाठी विविध प्रकारे योगदान देत असतात. सामाजिक उपक्रम, ग्राम विकास, जनजागृती, आपत्ती व्यवस्थापन आणि सार्वजनिक प्रश्न सोडविण्यासाठी अनेक माजी सैनिक प्रामाणिकपणे कार्यरत आहेत. मात्र, निवडणूक लढविण्यासाठी आवश्यक असणारा आर्थिक खर्च आणि इतर अडचणींमुळे अनेकांना राजकीय क्षेत्रात थेट प्रवेश करणे शक्य होत नाही.

माजी सैनिकांमध्ये शिस्त, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, नेतृत्वक्षमता आणि संघटनात्मक कामाचा अनुभव असतो. या गुणांचा उपयोग लोकशाही व्यवस्थेत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात होऊ शकतो. त्यामुळे निवडणूक लढविण्याची आर्थिक क्षमता नसलेल्या माजी सैनिकांना स्वीकृत सदस्यत्वाच्या माध्यमातून जनसेवेची संधी मिळाल्यास ग्रामीण आणि शहरी विकासाला नवी दिशा मिळू शकते, असे फाउंडेशनने निवेदनात नमूद केले आहे.

माजी सैनिकांच्या या मागणीला धोरणात्मक स्वरूप देण्यासाठी राज्य सरकारने आगामी हिवाळी अधिवेशनात अध्यादेश काढावा किंवा आवश्यक शासन निर्णय निर्गमित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. राज्यातील सर्व मंत्र्यांनी या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी शिफारस करावी. तसेच माजी सैनिकांच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न या अधिवेशनात मार्गी लावावा, अशी अपेक्षा फाउंडेशनने व्यक्त केली आहे.

माजी सैनिकांना राजकीय आरक्षण किंवा स्वीकृत सदस्यत्वाची संधी देणे हा त्यांच्या देशसेवेचा सन्मान ठरेल. सैनिकांनी देशाच्या सीमांचे रक्षण करताना दाखविलेली शिस्त, निष्ठा आणि समर्पण हीच मूल्ये समाजकारण आणि लोकप्रशासनातही उपयोगी पडतील. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा उपयोग राज्याच्या विकासासाठी करून घेण्याची संधी सरकारने उपलब्ध करून द्यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

या मागणीला राज्यातील विविध लोकप्रतिनिधींकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले. राज्यातील अनेक आमदार आणि खासदारांनी माजी सैनिकांच्या राजकीय प्रतिनिधित्वाच्या मागणीसाठी मुख्यमंत्री महोदयांकडे पत्राद्वारे शिफारस पाठविली असल्याची माहिती शिवाजी पालवे यांनी दिली.

महाराष्ट्रातील सर्व आजी-माजी सैनिक परिवार आणि शहीद परिवारांच्या वतीने ही मागणी करण्यात आली असून, सरकारने या विषयाकडे केवळ एका घटकाची मागणी म्हणून न पाहता देशसेवा केलेल्या सैनिकांच्या सन्मानाचा आणि लोकशाहीतील सहभागाचा प्रश्न म्हणून पाहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

Online Leave And Licence करिता संपर्क करा रोहन आजबे 9822020754

भाड्याने देणे
५६० स्क्वे.फूट
गाळा (२० X २८)
१३०० स्क्वे.फूट
2 BHK फ्लॅट
गावडेमळा, जुना पिंपळगाव माळवी
८० फुटी रोडटच, सावेडी,अ.नगर
9067751515

प्लॉट विकणे
केडगावमधील
स. नं. २०८/१/२०९
अरणगाव रोडवरील
३०३५ चा स्क्वे. फुटचा
९ मीटर रोड वरील
प्लॉट विकणे आहे.
8378976998

पाहिजेत IFB
वॉशींग मशिन कंपनीच्या सर्व्हीस सेंटरसाठी
१०/१२ वी पास / ITI
मुले पाहिजेत
ऑफिस कामासाठी लेडिज कोर्डिनेटर पाहिजे
पत्ता : भिस्तबाग चौक, पवन नगर रोड, सावेडी, अ. नगर.
9146416002
9922855124

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी
त्वरित पाहिजेत
सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षाचा अनुभव
कॅशिअर-०४
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar
7887395983

नगरमध्ये सावेडी येथील हॉटेलमध्ये
जागा भरणे
बिलींग काऊंटर
(महिल/पुरुष) -१
अनुभवीस प्राधान्य
वेटर/हेल्पर -४
8975496050

पाहिजेत
अकौटंट (पुरुष-२ महिला-२)
शिक्षण-बी.कॉम, कौशल्य-टॅली
अनुभव-१-५ वर्षे,
पगार-१५०००-२५०००
ठिकाण-१.मार्केटयार्ड अहिल्यानगर
२.एमआयडीसी अहिल्यानगर
प्रोडक्शन इंजिनियर
शिक्षण-डिप्लोमा मेकॅनिकल/ बीएससी
अनुभव -१ वर्ष,
पगार -१५०००-२२०००
डिझाइन इंजीनियर
शिक्षण-मेकॅनिकल इंजीनियर
कौशल्य-ऑटोकॅड, अनुभव-१ वर्ष,
पगार-२००००-३००००
आयटीआय-मेकॅनिकल-फिटर
अनुभव-फ्रेशर
पगार-अनुभवानुसार
टेलअस प्लेसमेंट सर्व्हिसेस
ठिकाण-एमआयडीसी अहिल्यानगर
8329666206
9511471313

शॉप विकणे
पाईपलाईन रोडटच प्राईम लोकेशन
४०० स्क्वे. फुट
शॉप विकणे आहे
9225800008
8624814351

3 BHK रो-बंगलो भाड्याने देणे
प्रशस्त पार्किंग, सर्व सुविधांयुक्त धर्माधिकारी मळा, सावेडी,अहिल्यानगर येथे
9881538977

REQUIRED
SENIOR ACCOUNTANT
Male, B. Com / M. Com, Full knowledge of GST, Income Tax & Finalization, Minimum 5 yrs. experience
Please call to arrange interview.
K PRAKASH & COMPANY
Market Yard Road, Ahilyanagar. Mob. 9665511179



सातवे
पुण्यस्मरण

दिवसामागून दिवस सरता
आठवणी पुन्हा ताज्या होतात
आपल्या यशोगाथाच्या स्मृतीत
आठवणीत कडा पानवतात

देहाने जरी आपण आमच्यात नसला तरी
आपली कृपाछाया सदैव आमच्यावर आहे

बुद्धवासी नानासाहेब लक्ष्मण पवार
माजी सैनिक
माजी पंचायत समिती सदस्य (नगर तालुका)
जन्म : ०१/०५/१९४१ । बुद्धवास : २७/११/२०१९

आपल्या पावन स्मृतीस
विनम्र अभिवादन!

दुःखांकित
श्रीमती इंदिरा नानासाहेब पवार (पत्नी)
डॉ. संतोष नानासाहेब पवार (मुलगा)
सौ. वर्षा संतोष पवार (सून)
श्री. अविनाश यादवराव गायकवाड (जावई)
सौ. अलका अविनाश गायकवाड (मुलगी)
डॉ. स्वाती तथागत रोकडे-पवार (मुलगी)
आशुतोष, मृदुला, श्वेता, मृणाल, आदित्य, ऐश्वर्या (नातवंडं)

समस्त पवार परिवार व आप्तेष्ट

अॅडव्हान्स बुकिंग सुरू
MY CINEMA
अॅडव्हान्स बुकिंग सुरू
AHILYANAGAR'S 1ST
5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow



Show - 27 to 29 Nov 26
GUNMAASTER (G9) - 10:15 am, 12:30, 3:15, 5:45, 8:15, 10:45 pm,
YEH PREM MOL LIYA - 9:45 am, 12:45, 2:15, 4:15, 7:15, 9:30, 10:30 pm,
MIRANDA WARNING - 7:40 pm,
RAMAYANA (2D)- 9:00 am, 3:00, 9:00pm,
RAMAYANA (3D)- 1:00, 6:30, 10:00 pm,
HEXED (3D English)- 11:00 am,
HEXED (3D Hindi)- 9:00 am, 4:30 pm,
AADI ANANT (Marathi) - 12:45, 6:30 pm,
GANA DHAV RE (Marathi) - 5:15 pm.

Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 27 ते ०३ डिसेंबर 2026

SCREEN - 1
रामायण (३डी)
08:45 AM 12.30 PM
02:30 PM 06:00 PM
09:45 PM



हेक्सेड थ्रीडी हिंदी 12:30 PM
01:15 AM



गन मास्टर जी-९ (हिंदी)
SCREEN - 3
08:30 AM
11:15 AM
02:00 PM
04:45 PM
07:30 PM
10:15 PM



- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

रामायण (२ डी)
SCREEN - 2
10:00 AM 01:45 PM
04:15 PM 08:00 PM
11:00 PM







गणा धाव रे! 01:45 PM
आधी अनंत 08:00 PM 09:20 PM 10:45 PM

ए प्रेम मोल लिया
SCREEN - 4
09:00 AM 12:15 PM
03:30 PM 06:45 PM
10:00 PM



SCREEN - 1 02:30 PM 01:15 AM

CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow

3rd Floor, Kohinoor Mall,
Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

दिनांक : २० ते २६ नोव्हेंबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे



SCREEN - 1
रामायण
09.00 AM 200/- (3D)
01.00 PM 250/- (3D)
05.00 PM 250/- (3D)
09.00 PM 250/- (3D)
SCREEN - 2
12.00 AM 200/- (2D)
09.00 PM 200/- (2D)

ओम चॅप्टर-१ SCREEN - 2 बंधू (मराठी)



09.00 PM 150/-



06.00 PM 150/-

आशा स्क्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

अक्षय मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध!
* अत्याधुनिक मोतीबिंदू (Phaco) शस्त्रक्रिया * चष्मा काढण्यासाठी लेसर उपचार (LASIK)
* केरॅटोकोनससाठी C3R उपचार कॉर्निया प्रत्यारोपण (Corneal Transplant)
* कॉर्नियावरील जखम व संसर्गाचे उपचार * प्टेरिजियम (डोळ्यावरील मास) शस्त्रक्रिया



* काचबिंदू (Glaucoma) तपासणी व उपचार
* रेटिना इंजेक्शन उपचार * तिरळेपणा शस्त्रक्रिया
* संगणकीकृत नेत्र तपासणी व चष्म्याचा नंबर

सर्व प्रकारच्या डोळ्यांच्या आजारांवर आधुनिक व तज्ञ उपचार
या तक्रारींवर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबीर

डॉ.सौ.नलिनी गिते (महिंद्रकर) नेत्र व कॉर्निया तज्ञ / मोतीबिंदू तज्ञ
MBBS, MS (Ophthalmology) FGO, FCRS (H.V. Desai Eye Hospital, Pune)

अक्षय मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल व प्रसुतिगृह
गीते हॉस्पिटल, बालिकाश्रम रोड,अहिल्यानगर Mo : 9257575714

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **संदिप केशव कर्डिले रा. बुऱ्हाणनगर, अ.नगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन विसाराची रक्कम देखील स्वीकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा,लिज, गहाण, दान,बक्षिस,पोटगी हक्क,सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

परिशिष्ट

१. मिळकतीचे वर्णनः जिल्हा अहिल्यानगर/अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, अहिल्यानगर / अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे नागरदेवळे येथील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

स.नं.	प्लॉट नं.	चौ.मीटर
११८/२अ२/२	९	३१५.००

या संपुर्ण प्लॉट मिळकतीबाबत.
यांसी चतुःसिमा-
पुर्वेस - रस्ता दक्षिणेस - रस्ता
पश्चिमेस - प्लॉट नंबर १० उत्तरेस - रस्ता
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि.२६/११/२०२६ अ.नगर.

अॅड. नाजीम अहमद इस्माईल शेख (बीएएलएलबी)
अॅड. कुरेशी फैजान फारुक (बीएएलएलबी, डीटीएल)
पत्ता- जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की विशेषतः ता. २१/११/२०२६ रोजी दै. नवा मराठा वर्तमानपत्रात मौजे बोल्हेगाव ता जि अहिल्यानगर येथील मिळकत सर्व्हे नंबर ९१/१ बाबत प्रसिध्द झालेली नोटीस आमच्या अशिलाच्या निदर्शनास आली. वास्तविक नोटीसीमधील मिळकतीचे मालक म्हणून १. बाबासाहेब जबाजी भिंगारदिवे, २. हिराबाई भानुदास डहाणे, ३. ठकूबाई पांडूरंग देठे, ४. लिला तुळशीराम पाडळे व आमचे अशिल यांनी अहमदनगर येथिल मा. दिवाणी न्यायालयात मौजे बोल्हेगाव येथील सर्व्हे नंबर ९१/१ या मिळकतीच्या वाटपाकामी दाखल केलेला दावा स्पेमु नं ५५/२०१६ चा प्रलंबित आहे. प्रस्तुतची मिळकत ही आमचे अशिल व नोटीस देणार यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. सदर मिळकतीमध्ये अद्याप हिस्से निश्चीत झालेले नाहीत. अशा परिस्थितीत वर नमुद केलेल्या मौजे बोल्हेगाव येथील स नं ९१/१ पैकी क्षेत्राचे खरेदीखत लिहून, नोंदवून देता येणार नाही. तरीही अशाप्रकारे खरेदी विक्री गाहाण, दान, बक्षिस, लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरणाचा व्यवहार वर नमुद केलेल्या व्यक्तिंना कायद्याप्रमाणे करता येणार नाही तसेच खरेदी घेणार यांना कोणत्याही प्रकारची मालकी अथवा कब्जा मिळणार नाही सबब बाबासाहेब जबा भिंगारदिवे व इतर यांचे बरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचे व्यवहार करु नये अथवा केल्यास संबंधीतांना मालकी व कब्जा प्राप्त होणार नाही कोणाचीही फसगत होवू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे. वेणुबाई आप्पाजी केदारे रा भिंगारदिवे मळा ता जि अहिल्यानगर अंजनाबाई संतोष साळवे रा. हिवरे झरे ता जि अहिल्यानगर यांचेकरिता
तारीख: २६/११/२०२६
अॅड. सौरभ सुभाष काकडे (बी.एस.एल. एल.एल.बी.)
३८७६, काकडे सदन, नांगरे गल्ली अहमदनगर
फोन नं. ९४२२३३३३३९

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **कानिफनाथ बबन पठारे रा.बनपिंपरी घोगरगांव अहिल्यानगर व ओमकार त्रिबंक फुंदे रा. चौधरी नगर, सोलापूर रोड, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर प्लॉट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :- डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. ४६/२/१पै मधील हिस्सा नंबर २७ मधील प्लॉट नं. २७ याचे क्षेत्रफळ १६५.६३ चौ. मी. ही संपूर्ण खुली प्लॉट मिळकत

- यांसी चतुःसिमा :-
पुर्व :- सर्व्हे नंबर ४७/१ पैकी, दक्षिण :- प्लॉट नंबर २८,
पश्चिम :- ९.००मी. रुंदीचा रस्ता उत्तर प्लॉट नं. २६,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत
अहिल्यानगर, दि. २६/११/१०२६

अॅड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे
अॅड. ओंकार पंडीत मोरे
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **प्रतिभा बाबासाहेब पठारे रा. पठारे वस्ती, नगर -मनमाड रोड, देहेरे, ता.जि. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर प्लॉट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :- डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी जिल्हापरिषद हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे वडगांवगुप्ता येथील सर्व्हे नं. ६६३ मधील प्लॉट नंबर २ याचे क्षेत्रफळ ३३९.५० चौ. मी. ही संपूर्ण खुली प्लॉट मिळकत.**
यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :-
पुर्वेस ; प्लॉट नं. ३, दक्षिणेस : ६० मी. शेंडी बायपास रोड,
पश्चिमेस : ९ मी. रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ८,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकती.
अहमदनगर दिनांक :- २६/११/२०२६

अॅड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे
अॅड. ओंकार पंडीत मोरे
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

जयंतीदिनी
विनम्र अभिवादन

आज ७४ व्या जयंतीनिमित्त त्यांनी
घडवलेले सुजाण नागरिक आणि लावलेले
ज्ञानाचे रोपटे हीच त्यांना खरी श्रद्धांजली...
त्यांच्या पवित्र स्मृतीस
विनम्र अभिवादन



आपल्या स्मृतिस विनम्र आदरांजली..!

स्व. किशोरी सायमन

-:शोकाकुल:-
समस्त आजी-माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी
समस्त सायमन परिवार
SK INDUSTRIAL SOLUTIONS FZE .
UNITY TRINITY TECHNICAL SERVICES LLC
www.mechcoreut.com